# १ सारांश

## १. १ प्रस्तावना

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (या कंपनीचा यापुढे टीपीसी असा संक्षिप्त उल्लेख केला आहे.) ही कंपनी मुंबई उपनगर परिसरात वीज पुरवठा करण्याचे, तसेच इतर परवानाधारक वीज पुरवठादार कंपन्यांना मोठया प्रमाणात वीज पुरविण्याचे काम करते. ही कंपनी १९१९ मध्ये स्थापन झाली. टीपीसी आपल्या एकात्मिक वापरासाठीचा वार्षिक महसुली आवश्यकता तसेच दर आकारणी अहवाल सन्माननीय आयोगाकडे तत्कालीन अधिनियमांनुसार सादर करत आली आहे. सन्माननीय आयोगाने मागणी केल्यानंतर टीपीसी काही गृहितांचा विचार करून वापरातील वीज वाहिन्यांच्या दरांचे पृथ्थकरण करून देत आली आहे. तसेच, या अहवालात गरज पडल्यास अधिक माहितीही टीपीसीने पुरविली आहे. त्यानंतर आयोगाने ऑगस्ट २००५ मध्ये वीज उत्पादक तसेच पारेषण आणि वितरणाचा परवाना असणाऱ्यांसाठी काही अटी आणि नियमांची रुपरेषा तयार केली आहे.त्याच नमुन्यानुसार टीपीसी उत्पादन, पारेषण आणि वितरणाचा अहवाल सादर करत आहे.

सन्माननीय आयोगाने शेवटच्या दर नियमावलीत दिलेल्या निर्देशांचे पालन टीपीसीने केले आहे.

## १.२ या याचिकेविषयीची सर्वसमावेशक भूमिका

वीज उत्पादन, पारेषण आणि वितरण यांमध्ये पारदर्शकता असावी, उत्तरदायीत्व आणि कार्यक्षमता वाढावी, यासाठी सन्माननीय आयोगाने दराच्याबाबतीत काही अटी आणि नियम लागू केले आहेत. एकात्मिक वापर असणाऱ्या कंपन्यांनी त्यांची मालमत्ता आणि दराबाबतची सर्व माहिती उघड करावी, असे या नियमांमध्ये गृहित धरले आहे.

### आर्थिक वर्ष २००६ चा सुधारित अहवाल –

वार्षिक महसुली आवश्यकता अहवालासाठी लागू केलेल्या विहीत नमुन्यांमध्ये टीपीसीने आर्थिक वर्ष २००६ (चालू वर्ष) आणि चालू वर्षातील प्रत्यक्ष कामकाजावर आधारित आर्थिक वर्ष २००७ चे सुधारित अंदाजपत्रक करणे आवश्यक आहे. सन्माननीय आयोगाने १३ एप्रिल २००६ रोजी दिलेल्या आदेशानुसार हा अर्ज गेल्यावेळेच्या अर्जाच्या निकषांवरच आधारित आहे.

*“ अ) नुकत्याच दिलेल्या दरांच्या आदेशानुसार वार्षिक महसुली आवश्यकता अहवाल मंजूर करण्याच्या तसेच दरनिश्चिततेच्या निकषांवर परवानाधारकांचे वार्षिक महसुली आवश्यकता अहवाल (०५-०६) मंजूर करणे अवलंबून असते. या निकषांनुसारच आर्थिक वर्ष २००६ मध्ये फरक भरून निघेल, असा टीपीसीचा अंदाज आहे. तसेच, आर्थिक वर्ष २००७ साठीच्या पायाभूत वार्षिक महसुली आवश्यकतेमध्येही या फरकाचा समावेश करण्यात आला आहे. ”*

## आर्थिक वर्ष २००७ साठीचा पृथक अहवाल

सध्या टीपीसी, रिलायन्स एनर्जी लिमिटेड, बेस्ट आणि स्वत: टीपीसी या तीन परवानाधारक वितरण कंपन्यांना वीज पुरवठा करते. या पुरवठयासाठी टीपीसी स्वत:च्या उत्पादनासह आपल्या पारेषण वाहिन्यांद्वारे बाहेरूनही वीज खरेदी करते. तसेच टीपीसीकडे वितरणाचा परवाना असल्याने विविध मार्गांनी मिळालेली वीज किरकोळ ग्राहकांना पुरविण्याचे कामही टीपीसीकडे आहे. या गृहितकांवर आधारीत टीपीसीची दोन मुख्य कामे दिसतात. उदाहरणार्थ: **टीपीसी ही एक वीज उत्पादक कंपनी म्हणून आपल्या पारेषण वाहिन्यांच्या माध्यमातून तीन परवानाधारक कंपन्यांना (रिलायन्स एनर्जी, बेस्ट आणि टीपीसी) वीज पुरवठा करणे** आणि टीपीसी ही स्वत: परवानाधारक वीज वितरण कंपनी. या कामात पारेषण वाहिन्या उत्पादनाबरोबर केवळ वीज वहनासाठी वापरल्या जातात. त्यासाठी सन्माननीय आयोगाच्या सूचनांनुसार पारेषणाचा भाग टीपीसी-जी (उत्पादन) पासून वेगळा केलेला असून त्याचा टीपीसी-टी (पारेषण) असा स्वतंत्र विभाग करण्यात आला आहे. या तिन्ही विभागांसाठी त्यानुसार अर्ज करण्यात आला असून एका विभागातील नफा आणि धोक्याचा परिणाम दुसऱ्या व्यवसायावर होणार नाही, हे गृहित धरलेले आहे या तरतुदीची पार्श्वभूमी लक्षात घेता, मुंबईतील वीज वितरणाची काही वेगळी वैशिष्टये आहेत. वीज कंपनी पुरवठयासाठी स्वत: वीज उत्पादित करते. तसेच, ती इतर मार्गांनी वीज विकत घेते. म्हणजेच परवानाधारक वीज वितरण कंपन्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी या कंपनीने वीज खरेदीचे करार केले आहेत.

टीपीसी आणि आरइएल यांच्या निर्मिती यंत्रणेत बिघाड झाल्यास अशा स्थितीती एमएसईबीशी स्टँडबाय तरतूद करून ठेवणे गरजेचे असते. दरविषयक नियमांत या तरतुदीचा सखोल विचार केला गेलेला नसल्याने या खर्चाच्या संदार्भात, त्यांच्या वर्गीकरणासाठी ‘‘ खर्चाचे कारण आणि त्यापासून मिळालेले लाभ ’’ हे तत्व अवलंबले जाते. ते तरतुदीच्या स्वरुपानुसार टीपीसीच्या उत्पादन केंद्राला आधार म्हणून झालेल्या पुरवठयासाठी दिलेले असते आणि या स्टँडबाय तरतुदीपोटी येणाऱ्या शुल्कात तिन्ही परवानाधारकांचा वाटा असतो. त्यामुळेच हा खर्च उत्पादन खर्चातील अविभाज्य भाग मानला जातो. म्हणूनच वार्षिक महसुली आवश्यकता अहवाल सादर करताना या खर्चाचा विचार उत्पादन या विभागातच केला जातो.

या शिवाय तिन्ही कंपन्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी खरेदी केलेल्या विजेच्या खर्चाचाही वेगळा विचार करावा लागेल. टीपीसी-जी (निर्मिती) आणि टीपीसी-टी (पारेषण) यांच्या वार्षिक महसुली आवश्यकता अहवालात हा खर्च टाकणे सोईचे ठरू शकते. मात्र, सन्माननीय आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांमुळे वीज उत्पादक आणि पारेषण कंपनीला वीज व्यापार करण्याची परवानगी नाही. म्हणूनच टीपीसीने या तीन परवानाधारकांसाठी (बीईएसटी, आरईएल आणि टीपीसी- वितरण) केलेल्या खर्चाची वसुली करण्यासाठी एक तरतूद प्रस्तावित केली जात आहे.

मालमत्ता आणि खर्चाचा विचार करताना मुख्यालय आणि इतर संबंधित सेवांच्या सामायिक खर्चासाठी काही सोईची गृहितके मान्य करण्यात आली आहेत.

वार्षिक महसुली आवश्यकता निश्चित करताना दर नियमांमध्ये अंतर्भूत नसलेले वहन शुल्क, वहनामधून मिळणारे उत्पन्न आणि वीज दरांव्यतिरिक्तचे उत्पन्न या बाबींचा समावेशही करावा लागतो.

**याचिकेमागील भूमिका**

कंपनीच्या वर्षभरातील कामगिरीशी योग्य प्रकारे तुलना करता यावी यासाठी वार्षिक महसुली आवश्यकतेमध्ये खालील बाबींचा विचार केला आहे.

- **पायाभूत वार्षिक महसुली आवश्यकता** – आर्थिक वर्ष २००७ साठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत महसुली आवश्यकतेत तीनही प्रकारांमधील ग्राहकांसाठी (तीनही व्यवसायांसाठी) , दर योग्य प्रमाणात दर्शविले जावेत यासाठी आवश्यकतेनुसार मूळ दरांत समायोजन प्रस्तावित करण्यात आले आहे.

- **मागील वर्षांच्या संदर्भात ताळमेळ** – या तरतुदीत मागील, पूर्ण झालेल्या वर्षातील प्रत्यक्ष आकडे तसेच वर्षांमध्ये झालेले परंतु अद्याप ज्यांची भरपाई झालेली नाही, असे खर्च समाविष्ट होऊ शकतात. यातील मुख्य बाब म्हणजे वसूल करता न येण्याजोगे इंधन समायोजन शुल्क. सन्माननीय आयोगाच्या निर्देशांनुसार दराच्या अस्थिर घटकाच्या तुलनेत दहा टक्क्यांपर्यंत ही वसुली केली जाऊ शकते. या समायोजन शुल्काच्या वसुलीवरील मर्यादा काढून टाकावी, अशी याचिका टींपीसीने दाखल केली आहे.२००६ च्या आर्थिक वर्षात इंधनाच्या वाढत्या किमतींचा इंधन समायोजन शुल्काच्या वसुलीवर परिणाम शक्यता आहे. तथापि, आयोगाने त्यांच्या ९ नोव्हेंबर २००५ च्या आदेशामध्ये ही बाब नाकारली आहे.

  आर्थिक वर्ष २००६ साठी दर विषयक आदेश उपलब्ध नसल्याने, आयोगाच्या आदेशानुसार, वसुली न झालेले इंधन समायोजन शुल्काच्या थकबाकीपोटीच्या खर्चाची सरासरी काढण्यात आली आहे आणि आर्थिक वर्ष ०६ मधील महसुली तुटीच्या सरासरीसह, आर्थिक वर्ष २००६ साठीच्या प्रत्यक्ष आकडेवारीत समाविष्ट करण्यात आली आहे. आयोगाने कृपया या रकान्याच्या समायोजनाचा विचार करावा.

**निकष –**

दर आदेशांत निर्देशित केल्याप्रमाणे टीपीसीने इंधन खर्चाचा हिशोब केलेला आहे. हे निर्देश टीपीसीच्या निर्मिती संचाला लागू असतील तसे, आयोगाने दिलेल्या काही संबंधित विशिष्ट आदेशांचा विचार करून तसेच एखाद्या विशिष्ट संचाबाबतची विशिष्ट परिस्थिती आदी बाबींचा विचार यांत करण्यात आला आहे. फक्त युनिट ४ आणि युनिट ७ चा याला अपवाद आहे. कारण सन्माननीय आयोगाच्या निर्देशांनुसार युनिट ४ हे स्डँडबाय युनिट म्हणून ठेवण्यात आले आहे. तर युनिट ७ ला गॅस पुरवठा कमी होत असल्याने त्याचाही विचार होऊ शकत नाही.

**युनिट ४ ची कार्यवाही –**

विजेची उपलब्धता कमी असताना विजेची गरज भागविण्यासाठी तसेच मुंबईतील भारनियमन टाळण्यासाठी अथवा महाराष्टात विजेचा तुटवडा झाल्यास त्याचबरोबर पारेषणात व्यत्यय आल्यास टीपीसाला टॉम्बे येथील युनिट ४ वापरणे बंधनकारक आहे. (टीपीसीला युनिट ४ आयोगाच्या आदेशांप्रमाणे चालवावे लागते.) आर्थिक वर्ष २००७ मध्ये अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे.

**पीटीसीकडून वीज खरेदी –**

टीपीसी आपली विजेची गरज भागविण्यासाठी पीटीसीकडून कोणत्याही अडथळ्याशिवाय किंवा पारेषण व्यवस्थेत व्यत्यय आणल्याशिवाय पीटीसीकडून २०० मेगावॉट (टीपीसीच्या हद्दीनपर्यंत १६५ मेगावॉट) घेणे गृहित आहे.

**गुंतवणूक –**

भविष्यासाठी संक्रमित गुंतवणुकीची योजना सादर करण्याची आवश्यकता आहे याची नोंद टीपीसीने घेतली आहे. अशी योजना टीपीसी द्वारे बनविली जात असून ती आयोगाच्या मंजुरीसाठी सादर केली जाईल.

**विशिष्ट व्यवसाय –**

या याचिकेच्या संदर्भात टीपीसी – जी म्हणजे वीजनिर्मितीचा कारभार , टीपीसी–टी म्हणजे पारेषण व्यवसार तर टीपीसी–डी म्हणजे वितरण व्यवहार अशी संरचना करण्यात आली आहे.

## १. ३ आर्थिक वर्ष २००५ मधील कामगिरी –

आर्थिक वर्ष २००६ मधील प्रत्यक्ष कामगिरीचा अहवाल, आर्थिक वर्ष ०६ साठीच्या पृथक खर्चाच्या अहवालात जून २००५ मध्येच सादर केला आहे. सध्याच्या नोंदीमध्ये याची पुनरावृत्ती केली जाणार नाही. तथापि, नोंदी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक वर्ष २००५ ची आकडेवारी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## १. ४ आर्थिक वर्ष २००६ ची कामगिरी –

आर्थिक वर्ष २००६ ची एकूण कामगिरी दर्शविताना या आर्थिक वर्षापैकी पहिल्या आठ महिन्यांची प्रत्यक्ष कामगिरी तसेच उर्वरित चार महिन्यांच्या कालावधीसाठी अपेक्षित कामगिरी याचा विचार करण्यात आला आहे. सादरीकरणाच्या सोयीसाठी तसेच सहज समजावे यासाठी टीपीसीने कामगिरीचा संपूर्ण आढावा थोडक्यात, पृथक स्वरूपात देण्याचा प्रयत्न केला आहे.

आर्थिक वर्ष २००६ साठी दर आदेशे उपलब्ध नसल्याने सन्मानीय आयोगाच्या आदेशांनुसार, वसुली न झालेले इंधन समायोजन शुल्क या आर्थिक वर्षातील महसुली तुटीत समाविष्ट करण्यात आले आहे आणि एकत्रितपणे प्रत्यक्ष तूट म्हणून नोंदीसाठी सादर करण्यात आले आहे. आयोगाने याच्या समायोजनाचा विचार करावा.

आर्थिक वर्ष २००६ मधील अंदाजित कामगिरी पुढीलप्रमाणे –

### १. ४. १ आर्थिक वर्ष २००६ साठी ऊर्जेची आवश्यकता –

काही विशिष्ट श्रेणींमध्ये किरकोळ बदल असले तरी या आर्थिक वर्षात कंपनीच्या परवाना विभागात १०,२१६ (एमयू) एवढी विक्री ही अपेक्षेनुसारच आहे. त्याचबरोबर आर्थिक वर्ष २००६ चा वार्षिक महसुली आवश्यकता अहवाल सादर करताना महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला (एमएसईबी) विजेची विक्री न करण्याचे प्रस्तावित होते. या उलट प्रत्यक्षात, विजेचा तुटवडा असल्याने एमएसईबीने टॉम्बे निर्मिती केंद्रातून, युनिट ४ सह अन्य संचातून या

वर्षात वीज घेतली आहे. आर्थिक वर्ष २००६ साठीच्या ऊर्जेचा ताळेबंद पुढील प्रमाणे --

**तक्ता : १. १: ऊर्जा ताळेबंद आणि वितरण व पारेषणातील तोटे ऊ आर्थिक वर्ष ०६**

MU

| Particulars | FY06 (Estimated) |
|---|---|
| Net Generation | 10,635 |
| Energy Interchange at MSEB-TPC exchange points | 1,352 |
| **Input to TPC System** | **11,987** |
| Sales | 10,128 |
| Energy Wheeling | 1,589 |
| **Total Output** | **11,717** |
| **Loss** | **270** |
| **Loss%** | **2.25%** |

मोसमी पाऊस चांगला झाल्यामुळे तसेच जलाशयात येणारे प्रवाहही वाढल्याने यंदा पाण्यापासून होणाऱ्या वीज निर्मितीमध्ये चांगल्याप्रमाणात वाढ झाली आहे. वाहून येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढल्याने जलाशयांतील पाण्याची पातळी वाढून पूरस्थिती निर्माम होऊ नये, यासाठी टीपीसीला बऱ्याचदा जबरदस्तीने वीज निर्मिती वाढवावी लागली. यामुळे महाग असलेली औष्णिक वीज घेण्याची वेळ टीपीसीवर आली नाही. पाण्यापासून वीज निर्मितीवर कृष्णा वॉटर डिस्प्यूट टायब्युनल ॲवार्ड (केडब्ल्यूडीटीए) यांचे नियंत्रण आहे. त्यामुळे वीज निर्मितीसाठी जादा पाण्याचा वापर करण्याची सूट मिळावी यासाठी टीपीसीने महाराष्ट्र शासनाचा पाटबंधारे विभाग आणि केडब्ल्यूडीटीए कक्षाशी संपर्क साधला आहे. भविष्यात अशी सूट लवकरच मिळेल अशी अपेक्षा करून आर्थिक वर्ष २००६ मध्ये १९७५ एमयू वीजनिर्मिती अंदाजित केली आहे. (आर्थिक वर्ष २००७ साठी १५०० एमयू अंदाजित करण्यात आली आहे.)

### १. ४. २ आर्थिक वर्ष २००६ मधील संचालनात्मक कामगिरी

टीपीसीच्या अधिपत्याखालील सर्व वीज निर्मिती केंद्रांची कामगिरी त्यांच्या हिट रेटचा विचार करता आर्थिक वर्ष २००६ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीपेक्षाही अधिक चांगली होणे अपेक्षित आहे. अर्थात, प्रत्येक युनिटच्या कामगिरीमध्ये भिन्नता असणारच. युनिट ४ वगळता सर्व युनिटमध्ये साह्यकारी वापर हा सादर केल्याप्रमाणेच आहे. युनिट ४ मध्ये हा संच सतत चालू- बंद करावा लागत असल्याने साह्यकारी वापर अर्थातच अधिक आहे.

### १. ४. ३ आर्थिक कामगिरी -

आर्थिक वर्ष २००६ मधील अंदाजित आर्थिक कामागिरीचा सारांश पुढील प्रमाणे--

**तक्ता -१- २ : आर्थिक वर्ष ०६ साठीची सुधारित महसुली आवश्यकता**

Rs. Crores

| Particulars | FY06 | |
|---|---|---|
| | As Filed | Revised |
| Fuel Expenses including Handling Chgs. | 1848 | 2170 |
| Power Purchase Cost | 159 | 139 |
| Wheeling Charges Payable | 19 | 19 |
| Stand By Charges | 396 | 396 |
| Employee Costs | 151 | 143 |
| Repairs & Maintenance Expenses | 109 | 87 |
| A&G Expenses | 91 | 91 |
| Depreciation | 155 | 160 |
| Forex Write off | 0 | 0 |
| Interest & Finance Charges | 57 | 45 |
| Interest on Security Deposit | 0 | 1 |
| Bad & Doubtful Debts | 2 | 0 |
| Tax on Income | 142 | 141 |
| ***Total Expenditure*** | **3128** | **3392** |
| Special Appropriations | 21 | 21 |
| Reasonable Return | 214 | 216 |
| **Gross ARR** | **3364** | **3629** |

*वरील अंदाजाचा आधार खालील पदांत स्पष्ट करण्यात आला आहे.*

### १. ४. ३. १ इंधन, वीज खरेदी आणि स्टँडबाय शुल्क

महसुली आवश्यकता अहवालात सादर करण्यात आलेल्या रू. १८४८ कोटी या अंदाजित इंधन खर्चाच्या तुलनेत आर्थिक वर्ष २००६ साठी इंधनाचा खर्च रू. २१७० कोटी एवढा अंदाजित आहे. या वर्षातील इंधनाच्या वाढत्या किमती आणि इंधनाच्या किंमतीतील तीव्र चढ – उतार यामुळे यांमुळे इंधन खर्चात ही वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २००६ मध्ये इंधनाच्या किमती सरासरी १७ हजार रुपये प्रति मेटिक टन अपेक्षित आहेत. (सध्याच्या किमती या पेक्षा कितीतरी अधिक आहेत.) प्रत्यक्षात आर्थिक वर्ष २००६ च्या वार्षिक महसुली आवश्यकतेतील नोंदीनुसार या किंमती १२ हजार ४०० रुपये प्रति मेट्रिक टन अंदाजित करण्यात आल्या आहेत. आर्थिक वर्ष २००६साठी वीज खरेदीवर १३९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्षात आर्थिक वर्ष २००६ च्या वार्षिक महसुली आवश्यकतेतील नोंदीनुसार हा खर्च १५९ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ आणि पीटीसी (संदर्भ – मेसर्स जेटीपीसीएल) यांच्याकडील वीज खरेदीच्या एकंदर खर्चावर तो आधारीत आहे. वीजेच्या कमतरतेमुळे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाची टीपीसीला वीज पुरवठा करण्याची क्षमता नसल्याने पीटीसीकडून वीज खरेदी करावी लागलेली आहे. वहन शुल्क मूळ नोंदीनुसारच अंदाजित करण्यात आले आहे. तसेच, आर्थिक वर्ष २००६ साठीचे स्टँडबाय शुल्कही दर आदेशांनुसारच म्हणजे ३९६ कोटी रुपये अंदाजित करण्यात आले आहे.

### १. ४. ३. २ इतर संचालनात्मक खर्च ---

आर्थिक वर्ष २००६ मध्ये कर्मचाऱ्यांशी संबंधित खर्च १४३ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. स्वेच्छानिवृत्ती योजनेवरील खर्च हा ए ॲन्ड जी रकान्यातून कामगारांवरील खर्च या रकान्यात टाकण्यात आल्याने, झालेला बदल वगळता, हा खर्च आर्थिक वर्ष २००६ च्या वार्षिक महसुली आवश्यकतेच्या नोंदीतील अंदाजाच्या

प्रमाणात आहे. दुरुस्ती आणि देखभालीवरील खर्च ८७ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. प्रत्यक्षात आर्थिक वर्ष २००६ च्या वार्षिक महसुली आवश्यकतेच्या नोंदीनुसार तो १०९ कोटी रुपये दर्शविण्यात आला आहे. मोठया प्रमाणात आवश्यक असलेली इमारतींची दुरुस्ती तसेच रंगकाम आदी काही अपरिहार्य कारणांमुळे पुढे ढकलण्यात आल्याने हा आकडा कमी झाला आहे.. खर्चातील ही तफावत आर्थिक वर्ष २००७ मध्ये लागू करण्यास आयोगाने परवानगी द्यावी यासाठी परवानगी मागण्यात आली आहे. आयोगाकडून परवानगी अद्याप आलेली नसल्याने आर्थिक वर्ष २००७ च्या अंदाजित संचालनात्मक खर्चात या तफावतीचा समावेश करण्यात आलेला नाही. आर्थिक वर्ष २००६ साठी ए अँड जी वरील सुधारीत खर्च नोंदीपेक्षा कमी अंदाजित करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छानिवृत्तीवरील खर्च आणि अन्य ऑपरेटिंग खर्च दुरुस्ती आणि देखभालीच्या खर्चाशी समायोजन केल्यानंतर हा आकडा रू. ९१ कोटी रुपये येतो.

### १. ४. ३. ३ भांडवलाशी निगडीत खर्च

आर्थिक वर्ष २००६ मधील घसारा अंदाजे १६० कोटी रुपये असून कर्जावरील व्याजाची रक्कम, आर्थिक वर्ष ०६ साठी सादर करण्यात आलेल्या महसुली आवश्यकता अहवालाच्या तुलनेत प्रत्यक्षात अधिक भांडवलीकरण आणि कमी गुंतवणूक यामुळे रू. ४६ कोटी अशी आहे. आर्थिक वर्ष २००६ मधील भांडवली खर्च, आर्थिक वर्ष ०६ साठीच्या महसुली आवश्यकता अहवालात सादर करण्यात आलेल्या रू. २५७ कोटी या रकमेच्या तुलनेत प्रत्यक्षात रू. १८२ कोटी होईल, असा अंदाज आहे. खेळत्या भांडवलावरील व्याज ८३ कोटी आणि भागभांडवलवारील परतावा २२९ कोटी रुपये होईल, असा अंदाज होता. प्राप्तिकर १४८ कोटी रुपये होईल, असा अंदाज आहे. समभागातील परताव्याच्या फरकामुळे पूर्वीच्या अंदाजापेक्षा ही रक्कम जास्त होत आहे. वैधानिक ताळमेळासाठी २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे आणि ही तरतूद आर्थिक वर्ष ०६च्या वार्षिक महसुली आवश्यकता अहवालातील नोंदीएवढीच आहे.

### १. ४. ४ वीज पुरवठ्याद्वारे मिळणारे उत्पन्न, दरांखेरीज उत्पन्न आणि स्टँडबाय शुल्क –

आर्थिक वर्ष २००६ मध्ये वीज विक्रीतून दोन हजार ९९३ कोटी रुपये मिळतील, असा अंदाज आहे. गेल्या काही वर्षांच्या

निष्कर्षांवरून वीज वहनाच्या उत्पन्नाचा अंदाज बांधण्यात आला आहे. दरांखेरीजचे उत्पन्न ५६ कोटी रुपये असेल. अहवालात ते ३३ कोटी रुपये असेल, असा अंदाज होता. काही असाधारण घटक, टीपीसीने पुरविलेल्या सेवांच्या मोबदल्यात प्राप्त झालेले, केवळ तत्कालिक असे उत्पन्न आणि जमिनविक्रीसारख्या व्यवहारांतून मिळालेले उत्पन्न यांमुळे ही वाढ झाली आहे. रिलायन्स एनर्जीचा स्टँडबाय शुल्कातील ९१ कोटी रुपयांचा वाटा विचारात घेऊनच सुधारीत महसुली आवश्यकता अहवाल बनविण्यात आला आहे.

आर्थिष वर्ष ०६ साठी अंदाजित करण्यात आलेले खर्च प्रत्यक्षात आल्यास, इंधन समायोजन शुल्कापोटी ५५१ कोटी रुपयांची वसुली करता येऊ शकते. मात्र, ती वसुली सन्माननीय आयोगाने ठरविलेल्या निर्बंधांमुळे मर्यादित राहते. त्यामुळे इंधन समायोजन शुल्कातून मिळालेले उत्पन्न हे प्रत्यक्षात टीपीसीने आकारलेले शुल्क आहे आणि

ही आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेच्या तुलनेत फारच कमी अशी रक्कम आहे. या मर्यादेमुळे भांडवल अडकून पडते या कडे टीपीसी ठळकपणे लक्ष वेधू इच्छिते. हे अडकून पडलेले भांडवल तसेच ते पुढे चालविण्यापोटीचा खर्च याचा विचार आयोगाने करायला हवा, असे टीपीसी सुचवित आहे. ही वसूल न झालेली रक्कम आणि तिचा खर्च यातील फरक आता आर्थिक वर्ष २००६ मध्ये गृहित धरण्यात आला आहे.

या आधारे आर्थिक वर्ष २००६ साठी तयार केलेला वार्षिक महसुली आवश्यकतेचा सुधारित अहवाल पुढीलप्रमाणे :

**तक्ता १. ३: आर्थिक वर्ष ०६ साठीची सुधारित महसुली आवश्यकता**

Rs. Crores

| Particulars | FY06 | |
|---|---|---|
| | As Filed | Revised |
| **Gross ARR** | **3364** | **3629** |
| Less: Non Tariff Income | 33 | 56 |
| Less: Income from Standby Charges | 91 | 91 |
| Less: Revenue at Current Tariffs | 2916 | 2993 |
| **ARR Gap to be Recovered** | **324** | **489** |
| Less: Income from FAC | 352 | 219 # |
| **Net Gap** | **-28** | **270** |
| Carrying Cost for Unrecovered FAC | 0 | 18 |
| **Total Gap** | **-28** | **288** |

# इंधन समायोजन शुल्काद्वारे प्राप्त उत्पन्नात टीपीसीला, तेल खरेदीवरील करांच्या संदर्भातील वाद संपुष्टात आल्याने प्राप्त झालेल्या परताव्याचाही समावेश आहे.

आर्थिक वर्ष ०७ साठीचा महसुली आवश्यकता अहवाल पृथक स्वरूपात सादर केला जात आहे हे लक्षात घेता, आर्थिक वर्ष ०६ मध्ये हा खर्च तीनही परवाना धारकांमध्ये विभागला गेलेला होता, परिणामी आर्थिक वर्ष २००६ मधील फरक टीपीसी-जी (निर्मिती) मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष २००७ साठी टीपीसी-जी (निर्मिती) च्या आर्थिक महसुली आवश्यकेतून वसुल करावयाची आर्थिक वर्ष २००६ मधील फरकाची रक्कम २८८ कोटी रुपये होते. (३३२ कोटी रुपये - वसूल न झालेले इंधन समायोजन शुल्क अधिक १८ कोटी रुपये-वसूल न झालेल्या इंधन समायोजन शुल्कावरील खर्च आणि ६२ कोटी रुपये-आर्थिक वर्ष २००६ मधील निव्वळ फरक.)

## १.५ २००७ आर्थिक वर्षातील वीजनिर्मिती उद्योगासाठीचे (टीपीसी-जी) महसूल निर्धारण

परवानाधारकांना उपलब्ध करून दिलेल्या ऊर्जा आणि क्षमतेसाठी 'टीपीसी-जी'ला जो मोबदला मिळेल, त्याच्या आधारावर 'टीपीसी-जी'च्या महसुलाचे निर्धारण केलेले आहे. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर एकात्मिक स्वरूपाच्या ऊर्जेची संपादणूक होत असल्याने ऊर्जेची आवश्यकता आणि संपादणूक यांची निश्चिती या पकरणात केलेली आहे. इथे केवळ 'टीपीसी-जी'च्या संदर्भातील खर्चाचा समावेश करण्यात आलेला आहे. तर 'टीपीसी-डी'च्या वर्षिक महसुली आवश्यकतेत (एआरआर) वीज खरेदी शुल्कांच्या मुद्यांचा ऊहापोह **प्रकरण १.२** मध्ये निश्चित केलेल्या आराखडयानुसार करण्यात आलेला आहे.

तीन परवानाधारकांच्या ऊर्जेची गरज, त्यांची स्वत:ची निर्मिती आणि बाहेरून केलेली खरेदी ( जसे स्वत:च्याच वतीने 'टीपीसी-डी'ने, बीईएसटीने आणि आरईएलने केलेली खरेदी) यातून उपलब्धतेनुसार पूर्ण होईल असे गृहित

धरले आहे. २००७ या आर्थिक वर्षातील निर्मिती आणि वीजखरेदीचे अंदाज हे युनिटमधील तांत्रिक अडथळे, वीजवहन व्यवस्थेची उपलब्धता, वीजतुटवडा, पाण्याचा साठा, इंधनाच्या किमती, स्वत:साठीच्या वापराबाबत लागू होणारे निकष, औष्णिक पकल्पांसंदर्भात हीटरेट यांचा विचार करून बांधण्यात आले आहेत. निर्मितीची आवश्यकता काढण्यासाठी पस्तावित विक्री, पारेषण-वितरणातले तोटे आणि स्वत:साठीचा वापर यांचा एकत्रित विचार करून द्यावयाची एकूण युनिट्स मोजलेली आहेत.विविध स्त्रोतांद्वारे मिळणारी वीज ही मागणीनुसार पुरवठा तत्त्वावर काढलेली आहे. वीजतुटवडा निर्माण झाल्याच्या परिस्थितीत एमएससीबीकडून वीज खरेदी केली जाईल. स्वत: निर्मिती केलेल्या विजेच्या दराचे निर्धारण हे आयोगाने या युनिट्ससाठी निश्चित केलेल्या निकषांवर आधारित असेल. तसेच २००७ या आर्थिक वर्षातील इंधनाचे दर आणि मागणीच्या आराखडयानुसार निश्चित होणारी कार्यवाही यावरही आधारित असेल. कार्यवाहीच्या संदर्भातील काही विशिष्ट मुद्यांबाबत अपुऱ्या ठरणाऱ्या निकषांसाठी अपवाद निश्चित करण्यात आले आहेत.

### १. ५. १ २००७ या आर्थिक वर्षातील ऊर्जेची आवश्यकता

पूर्वीचे एकंदर अनुभव आणि रिलायन्सच्या वीज पकल्पातून होणारी कमी अधिक निर्मिती यावर 'टीपीसी-जी'कडून तीन परवानाधारकांना लागणारी वीज अवलंबून असेल. या पमाणे ऊर्जेची एकूण आवश्यकता अंदाजे १०,७४१ एमयू आहे. परवानाधारकांनी त्यांच्या रिन्युएबल पर्चेस ऑब्लिगेशनची (आरपीओ) मिळवणी करणे अपेक्षित आहे. हे लक्षात घेता 'टीपीसी-जी'कडून लागणारी वीज ही त्यांच्या रिन्युएबल पर्चेस ऑब्लिगेशनच्या व्यतिरिक्त निव्वळ असेल. म्हणजेच 'टीपीसी-जी'ची विक्री तीन परवानाधारकांच्या रिन्युएबल पर्चेस ऑब्लिगेशन आवश्यकतेला वगळून निव्वळ (११५ एमयू) आहे. तीन परवानाधारकांची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्मिती आणि वीज खरेदीचे पमाण निश्चित होण्यासाठी वीजवहनातील १.५ टक्के नुकसान ह्या विक्रीत अंतर्भूत केले आहे. एकूण आवश्यकता अंदाजे १०,९३१ एमयू इतकी आहे.

### १. ५. २ २००७ या आर्थिक वर्षातील निर्मिती उद्योगाची महसूल आवश्यकता

वितरण परवानाधारकांना पुरवठा करणाऱ्या निर्मिती उद्योगाने नियमांनुसार आकारलेले दर हे ऊर्जा शुल्क आणि स्थिर शुल्कानुसार निश्चित करण्यात आलेले आहेत.

निर्मिती केंद्रांसाठी **ऊर्जा शुल्क** त्यांच्या इंधन खर्चानुसार निश्चित करण्यात आले आहे.

मागणीनुसार निश्चित झालेले निर्मिती केंद्रांचे इंधनखर्च कार्यात्मक निकष आणि २००७ या आर्थिक वर्षातील इंधन किमतींनुसार अंदाजित केले आहेत. वीजेची विक्री वितरणाच्या करारानुसार वीजेचे सध्याचे दर आणि एकूण प्रमाण यावर आधारित आहे. 'टीपीसी-डी'च्या वार्षिक महसुली आवश्यकतेत (एआरआर) याचा समावेश केलेला आहे.

**वार्षिक स्थिर शुल्क** हे खालील बाबींच्या एकूण खर्चानुसार निश्चित केले आहे-

- संचालन आणि देखभाल खर्च
- नियामक (रेग्युलेटरी) कर्जावरील व्याज
- खेळत्या भांडवलावरील व्याज
- घसारा
- नियामक (रेग्युलेटरी) रोख्यांवरील परतावा
- आयकर
- नियमांनुसार निर्मिती आणि क्षमता निर्देशांकासाठी दिले जाणारे उत्तेजनपर लाभ
- स्टँडबाय चार्जेस
- वहन शुल्क

तीन परवानाधारकांकडून पाप्त करण्याचा महसूल निश्चित करण्यासाठी वर उल्लेखिलेल्या महसूल आवश्यकतेत दर लागू न होणारे उत्पन्न आणि स्टँडबाय चर्जेसमधून मिळणारे उत्पन्न वगळले आहे.

### १. ५. ३ ऊर्जा शुल्क

१.५.१ मध्ये नमूद करण्यात आलेली ऊर्जेची गरज स्वत: केलेली निर्मिती आणि वीजखरेदी यातून पूर्ण होईल. औष्णिक निर्मिती किती पमाणात होईल याचा अंदाज मागील वर्षातील कामगिरीवर बेतलेला आहे. तर जलविद्युतनिर्मिती पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. २००६ या वर्षात चांगला मान्सून होऊन पाणीसाठे वाढतील अशा शक्यतेवर जलविद्युतनिर्मितीचे वाढीव पमाण अपेक्षित धरले आहे. टीपीसीली केडब्ल्यूडीटीएच्या अंतर्गत करारानुसार अधिक मात्रेत पाण्याचा वापर करण्यची परवानगी मिळू शकेल, असाही अंदाज आहे.

२००७ या आर्थिक वर्षात मागणीनुसार पुरवठयावर आधारित एकंदर ऊर्जेचा समतोल खालील पमाणे असेल.

तक्ता १.४ २००७ या वर्षातील ऊर्जेचा समतोल

| Sr. No. | Particulars | MUs |
|---|---|---|
| A | **Energy Requirement** | |
| | Sales to TPC-D | 2,478 |
| | Sales to REL | 4,062 |
| | Sales to BEST | 4,202 |
| | **Total Sales of TPC-G** | **10,741** |
| | RPO for Licensees | 115 |
| | Wheeling for MSEB at 22kV | 1,585 |
| | **Total Energy Wheeled** | **1,700** |
| | Transmission Losses (MU) | 189 |
| | **Total Energy Requirement** | **12,631** |
| B | **To be Met With** | |
| | Own Generation (Net) | 9,432 |
| | Hydel (Ex-bus) | 1,493 |
| | Thermal (Ex-Bus) | 7,939 |
| | Power Purchase from MSEB | 61 |
| | Power Purchase from PTC | 1,438 |
| | Energy Input for RPO for Licensees | 115 |
| | Energy Input by MSEB at 22 kV | 1,585 |
| | **Total Supply** | **12,631** |

- **इंधनखर्च**

वेगवेगळ्या युनिट्सच्या परिवर्तनीय निर्मिती खर्चाचे तपशील खालील पमाणे मांडण्यात आलेले आहेत.

तक्ता १. ५: वीज निर्मितीचा परिवर्तनीय खर्च

| Unit | Fuel | Calorific Value kCal/kg A | Heat Rate Kcal/kWh B | Fuel Price Rs./Ton C | Unit Variable Cost Rs./kWh B/A * C / 1000 |
|---|---|---|---|---|---|
| Unit 4 | Fuel Oil | 10,500 | 2,600 | 22,700 | 5.62 |
| Unit 5 | Coal | 4,802 | 2,450 | 2,840 | 1.45 |
| Unit 5 | Fuel Oil | 10,500 | 2,450 | 22,700 | 5.30 |
| Unit 6 | Gas | 13,000 | 2,450 | 4,914 | 0.93 |
| Unit 6 | Fuel Oil | 10,500 | 2,450 | 22,700 | 5.30 |
| Unit 7 | Gas | 13,000 | 2,000 | 4,914 | 0.76 |

निर्मितीकेंद्रांमधून द्यावयाची अंदाजे वीज, निश्चित केलेले निकष आणि इंधनाच्या किमती यांच्या आधारे काढलेला टीपीसीच्या निर्मिती केंद्रांचा एकूण इंधनखर्च हा खालील पमाणे मांडण्यात आलेला आहे,

**तक्ताः १.६ टीपीसीच्या निर्मिती केंद्रांचा निर्मितीखर्च**

| Unit | Net Despatch as per MOD (MUs) A | Auxiliary Consumption (%) B | Auxiliary Consumption MUs | Gross Generation (MUs) C=A/(1-B) | Variable cost (Rs./kWh) D | Total Fuel Cost (Rs. Crores) E=C * D/10 |
|---|---|---|---|---|---|---|
| Hydel | 1,493 | 0.50% | 8 | 1,500 | - | - |
| Unit 7 Gas | 1,375 | 3.00% | 43 | 1,418 | 0.76 | 107 |
| Unit 6 Gas | 23 | 4.00% | 1 | 23 | 0.93 | 2 |
| Unit 5 Coal | 3,468 | 7.00% | 261 | 3,729 | 1.45 | 540 |
| Unit 6 Oil | 2,546 | 4.00% | 106 | 2,653 | 5.30 | 1,405 |
| Unit 5 Oil | 358 | 7.00% | 27 | 385 | 5.30 | 204 |
| Unit 4 Oil | 168 | 8.00% | 15 | 183 | 5.62 | 103 |
| **Total** | **9,432** | | **460** | **9,892** | | **2,362** |

वर नमूद केलेल्या खर्चाच्या बरोबरीने टीपीसीने इंधन हाताळणी शुल्कांचा अंदाज १२ कोटी रु. मांडलेला आहे. २००७ या आर्थिक वर्षात एकूण इंधनखर्च आणि ऊर्जा शुल्क **२,३७४ कोटी रु.** ठरवण्यात आलेले आहे.

## १.५.४ भांडवली खर्चाचा आराखडा

टीपीसीने २००७ या आर्थिक वर्षासाठी भांडवली खर्चावरच्या योजनांवर ४३३ कोटी रु. खर्च करण्याचे ठरवले आहे. योजनांवर गेल्या वर्षीचा पडलेला खर्च आणि नव्या योजनांवरील खर्च यांचा एकत्रित विचार २००७मध्ये मांडलेला आहे. खर्चाचे तपशील पुढील पमाणे,

**टेबल १.७– २००७ या आर्थिक वर्षासाठी संपल्पित भांडवली खर्च**

Rs. Crores

| Particulars | Expenditure FY07 |
|---|---|
| Expenditure on Carry Forward Schemes | 58 |
| Expenditure in New Schemes | 370 |
| Contingency Provision @ 1% | 4 |
| **Total** | **433** |

२००७ या आर्थिक वर्षात नव्या योजना सुरू करून पुढील ३-४ वर्षात त्या पूर्ण करण्यासंदर्भात विचार होत आहे. तीन परवानाधारकांच्या वीजविषयक गरजा भागवणारी संस्था म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडण्याच्या दृष्टीने टीपीसी-जी दोन क्षेत्रांचा बारकाईने विचार करत आहे.

- गेल्या नजिकच्या काळात उद्‌भवलेली सध्याची वीज क्षेत्रातील परिस्थिती लक्षात घेता सर्वाधिक गरजेच्या वेळी मोठया प्रमाणात विजेचा तुटवडा भासू लागला आहे, हे चित्र स्पष्ट आहे. ही परिस्थिती साधारण पाच वर्षांपर्यंत अशीच राहू शकते. या दरम्यानच्या काळात कदाचित निर्मिती क्षमतावाढीतील गुंतवणुकींचा परिणाम दिसू लागेल.
- पुढच्या काळात तेलाच्या किमती अजूनच वाढण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. या पार्श्वभूमीवर दीर्घ काळाचा विचार करता टीपीसीला कोळसा या इंधनाकडे अधिक गांभिर्याने पाहण्याची गरज जाणवत आहे.

या बाबींचा विचार करता त्या दृष्टीने हालचाल करण्यासाठी टीपीसी-जी आपली क्षमता टप्प्याटप्प्याने ५० टक्क्यांपर्यंत

वाढवून ९०० मेगावॅट इतकी करण्याची योजना आखत आहे. या ९०० मेगावॅट मधील ३५० मेगावॅटची निर्मिती (कोळशापासून २५० मेगावॅट + डिझेलपासून १०० मेगावॅट) ही वाढत्या भारामुळे तत्काळ हाती घेण्याची योजना आहे. हे अशा संपादणुकीला मान्यता देणा-या दरनियमावलीतील( तरतुदींना धरूनच आहे. उर्वरित ५५० मेगावॅट क्षमता विकसित होण्याच्या मार्गावर आहे. योजना अंतिम टप्प्यात पोहोचल्यावर टीपीसी-जी सन्माननीय आयोगाला त्याबाबत कळवेलच.

खूप भांडवलाची गरज असलेल्या या पकल्पांचा विचार करता नव्या योजनांचे वर्गीकरण दोन पकारे करता येईल. काही वर्षातील भांडवली खर्चाची वास्तविक तुलना करण्यासाठी विशेष प्रकल्प आणि सामान्य भांडवली खर्चाचे प्रकल्प असे विभाजन करता येईल.

- **विशेष प्रकल्प** – या योजनांवरचा एकूण खर्च १,१४२ कोटी रू. इतका अंदाजित आहे. २००७ या आर्थिक वर्षात यातील **३०९ कोटी रू.** खर्च करण्याचा प्रस्ताव आहे.
- **सामान्य भांडवली खर्च** – या योजनांवरचा एकूण खर्च ८१ कोटी रू. अंदाजित आहे. त्यापैकी २००७ या आर्थिक वर्षात **५६ कोटी रू.** खर्च करण्याचा प्रस्ताव आहे.

## १. ५. ५ वार्षिक स्थिर खर्च

- **संचालन आणि देखभाल खर्च**

  निर्मिती प्रक्रियेसाठी सन्माननीय आयोगाने संचालन आणि देखभाल खर्चमोजणीचे निकष निश्चित केलेले आहेत. त्यानुसार २००४ साली संपलेल्या ५ वर्षातील संचालन आणि देखभाल खर्चाची एकूण सरासरी ही २००२ या आर्थिक वर्षासाठी विचारात घेऊन खर्च काढलेला आहे. हा खर्च संबंधित वर्षासाठी वार्षिक ४ टक्के या स्थिर दराने वाढलेला आहे. याप्रमाणे संचालन आणि देखभाल खर्च **३०० कोटी रू.** अंदाजित आहे. इथे हेही नमूद करायला हवे की, सरासरी निश्चित करताना सामान्य खर्च काढण्यासाठी अपवादात्मक, एकदाच उद्भवणारे वाय टू के समस्येवरील खर्च, शंकास्पद कर्जासाठीची तरतूद, मागे घेतल्या गेलेल्या तरतुदी यांसारखे खर्च वजा केलेले आहेत.

- **वैधानिक कर्जावरील व्याज**

  भांडवली खर्चासाठी अर्थसहाय्य देण्याच्या संदर्भात आयोगाने धोरणानुसार कर्ज आणि समभागांचे प्रमाण (नॉरमॅटिव्ह डेट-इक्विटी रेशो) ७०-३० असे निश्चित केलेले आहे. त्यानुसार २००४-०५-०६ या आर्थिक वर्षांसाठी प्रस्तुत कर्जावरील व्याज मान्य केलेले आहे. २००७ या वर्षातील प्रस्तावित गुंतवणुकींसाठी ‘टीपीसी-जी’ ने हाच मार्ग स्वीकारला आहे. २५० मेगावॅट आणि १०० मेगावॅट क्षमतेच्या निर्मिती केंद्रांच्या उभारणीच्या काळात या मालमत्तेवरील भांडवली खर्चासाठीच्या कर्जावरील व्याज हे व्याज मानलेले नाही. याप्रमाणे २००७ या आर्थिक वर्षात (२००४-०५ या आर्थिक वर्षासाठीच्या दरआज्ञावलीनुसार) १० टक्के व्याजदराने **३१ कोटी रू.** इतके व्याज अंदाजित आहे.

३१ मे २००४ च्या स्टँडबाय फॅसिलिटीसंदर्भातील सन्माननीय आयोगाच्या आज्ञेनुसार टीपीसीला आपले दायित्व पूर्ण करण्यासाठी १८८ कोटी रू.चे तात्कालिक कर्ज आहे. या कर्जावरील व्याजाचाही विचार केलेला आहे.

- **खेळत्या भांडवलावरील व्याज**

आयोगाने सूचित केलेल्या नियमांमध्ये खेळत्या भांडवलाच्या निश्चितीसंदर्भातील मुद्दे स्पष्ट केले आहेत. या नियमांनुसार निर्मिती कंपन्यांना खेळत्या भांडवलावरील व्याज स्थिर शुल्काचा एक भाग म्हणून मिळवण्याची परवानगी आहे. व्याजाच्या हिशेबासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे लघुमुदतीसाठीचे जे किमान कर्जदर आहेत त्यानुसार व्याजदर निश्चिती करण्यात आली आहे. यानुसार टीपीसीचे २००७ या आर्थिक वर्षासाठी खेळत्या भांडवलावरील व्याज **८५ कोटी रू.** इतके काढलेले आहे.

- **घसारा**

दरनियमावलीत आयोगाने घसा-याचे नवे दर स्पष्ट केले आहेत. हे दर स्टेट लाईन बेसिसवर आर्थिक वर्षातील सुरूवातीच्या एकूण स्थिर मालमत्तेवर लागू होतील. २००७ या आर्थिक वर्षातील घसारा पूर्ण करण्यासाठी भांडवली खर्चात कमी अधिक फेरफार केले जातील. २००७ या आर्थिक वर्षासाठी **६० कोटी रू.** इतका घसारा अंदाजित आहे.

- **नियामक रोख्यांवरील परतावा**

नवीन नियमांनुसार निर्मिती केंद्रे उद्योगात गुंतवलेल्या रोख्यांवर परतावा मिळवू शकतात. सन्माननीय आयोगाकडे सादर केल्याप्रमाणे, दर नियमावलीतील तरतुदींनुसार २००७ या आर्थिक वर्षात टीपीसीच्या विविध उद्योगांमध्ये विभागलेल्या रोख्यांवर मिळणारा परतावर हा **१५७ कोटी रू.** इतका अंदाजित आहे.

- **आयकर**

२००७ या आर्थिक वर्षातील करासाठीची तरतूद ही रोख्यांवरील परताव्यावर लागू होणारे कर, उत्तेजनपर लाभ आणि वैधानिक ताळमेळ यानुसार निर्धारित करण्यात आलेली आहे. ही रक्कम ९५ कोटी रू. इतकी आहे.

- **निर्मिती आणि क्षमता निर्देशांकासाठी दिले जाणारे उत्तेजनपर लाभ**

औष्णिक वीज निर्मिती केंद्रांना पीएलएफचे लक्ष्य साध्य करण्यासाठी मागणीनुसार पुरवठयाअंतर्गत निश्चित केलेले उत्तेजनपर लाभ आणि जलविद्युत निर्मितीच्या क्षमता निर्देशांकासाठीचे उत्तेजनपर लाभ हे दरनियमावलीत नमूद केलेल्या दरांवर आधारित आहेत. हे लाभ **३१ कोटी रू.** इतके आहेत.

- **स्टँड बाय चार्जेस**

  स्टँड बाय चार्जेस **३९६ कोटी रू.** अंदाजित आहेत.

- **वीज वहन शुल्क**

  ट्रॉंबे येथील टाटा पॉवर कंपनी आणि एमएससीबी दरम्यान २२० केव्ही उर्जेचा विनिमय होतो. एमएससीबीच्या पारेषण वाहिन्यांमधून होणा-या या वीजवहनासाठी २ टक्के देयदर आहे. याप्रमाणे वीजवहनासाठी **१८ कोटी रू.** इतका खर्च अंदाजित आहे.

  या प्रमाणे टीपीसीला प्राप्त वार्षिक स्थिर शुल्क **११८७ कोटी रू.** इतके काढण्यात आले आहे.

  त्याचे तपशील खालीलप्रमाणे –

**तक्ता १. ८ : आर्थिक वर्ष ०७ साठी टीपीसी– जी चे वार्षिक स्थिर खर्च**

Rs. Crores

| Particulars | Fixed Charges |
|---|---|
| O&M Charges | 300 |
| Interest on Normative Debt | 45 |
| Interest on Working Capital | 85 |
| Depreciation | 60 |
| Return on Equity | 157 |
| Income Tax | 95 |
| Incentive on Thermal and Hydro Generation | 31 |
| Stand-by Charges Payable | 396 |
| Wheeling Charges Payable | 18 |
| **Annual Fixed Charges** | **1,187** |

आयोगाने निर्देशित केलेल्या आवश्यकतेनुसार औष्णिक वीज केंद्रांसाठीचा खर्च युनिटशः तर जलविद्युत निर्मिती केंद्राचा खर्च स्टेशनशः वेगळा दर्शविण्यात आला आहे. अशा प्रकारे स्वतंत्रपणे दाखविण्यात आलेली खर्चाची रक्कम आणि त्यामागील कारणे यांचा तपशील पुढील तक्त्यात देण्यात आला आहे.

## तक्ता १. ९ : आर्थिक वर्ष ०७ साठी औष्णिक आणि जल विद्युत निर्मितीची विभागणी

Rs. Crores

| S.No | Particulars | Total Generation | Total Thermal | Total Hydro |
|---|---|---|---|---|
| 1 | O&M Charges | 299.79 | 228.97 | 70.82 |
| 2 | Interest and Finance Charges | 0.19 | 0.11 | 0.08 |
| 3 | Interest on Normative Debt | 44.62 | 35.13 | 9.49 |
| 4 | Interest on Working Capital & Security Deposit | 84.91 | 80.52 | 4.40 |
| 5 | Depreciation & Related Debits | 60.36 | 31.92 | 28.43 |
| 6 | Return on Equity | 157.48 | 101.17 | 56.31 |
| 7 | Incentives | 31.07 | 19.17 | 11.89 |
| 8 | Income Tax | 94.56 | 60.75 | 33.81 |
| 9 | Wheeling Charges Payable | 18.13 | 18.13 | |
| 10 | Stand-by Charges Payable | 396.00 | 396.00 | |
| **11** | **Gross Fixed Charges** | **1,187.10** | **971.87** | **215.23** |

युनिट तसेच स्टेशन यांच्या नुसार स्थिर खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

## तक्ता १. १०: आर्थिक वर्ष ०७ : वार्षिक स्थिर खर्च : औष्णिक वीज निर्मिती केंद्रांसाठी

(रु. कोटी)

| S.No | Particulars | Total Thermal | Thermal | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Unit 4 | Unit 5 | Unit 6 | Unit 7 | Remarks |
| 1 | O&M Charges | 228.97 | 5.00 | 112.27 | 73.02 | 38.68 | Allocated in Proportion of Gross Generation |
| 2 | Interest and Finance Charges | 0.11 | 0.00 | 0.04 | 0.03 | 0.04 | Allocated on basis of GFA as on 31.12.05 |
| 3 | Interest on Normative Debt | 35.13 | 1.85 | 22.52 | 8.01 | 2.75 | |
| 4 | Interest on Working Capital & Security Deposit | 80.52 | 13.72 | 17.27 | 45.22 | 4.30 | |
| 5 | Depreciation & Related Debits | 31.92 | 1.55 | 8.97 | 5.07 | 16.34 | |
| 6 | Return on Equity | 101.17 | 2.76 | 37.13 | 25.45 | 35.83 | |
| 7 | Incentives | 19.17 | - | 15.27 | - | 3.91 | |
| 8 | Income Tax | 60.75 | 1.66 | 22.30 | 15.28 | 21.51 | Allocated on basis of RoE |
| 9 | Wheeling Charges Payable | 18.13 | - | 8.93 | 5.99 | 3.21 | Allocated in Proportion of Generation from Units 5, 6, 7 |
| 10 | Stand-by Charges Payable | 396.00 | 44.66 | 148.87 | 148.87 | 53.59 | Allocated in Proportion of Installed Capacity |
| **11** | **Gross Fixed Charges** | **971.87** | **71.20** | **393.57** | **326.95** | **180.16** | |
| **12** | Less:Non Tariff Income | 15.80 | 0.57 | 4.88 | 4.25 | 6.09 | |
| **13** | Less: Income from Standby Charges | 91.00 | 10.26 | 34.21 | 34.21 | 12.32 | Allocated in Proportion of Installed Capacity |
| **15** | **Net Fixed Charges** | **865.07** | **60.36** | **354.48** | **288.48** | **161.75** | |

### तक्ता १. ११ : आर्थिक वर्ष ०७ : वार्षिक स्थिर खर्च : जल विद्युत निर्मिती केंद्रांसाठी

(Rs. Crores)

| S.No | Particulars | Hydro | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Hydro | Khopoli | Bhivpuri | Bhira | Remarks |
| 1 | O&M Charges | 70.82 | 22.86 | 17.49 | 30.47 | |
| 2 | Interest and Finance Charges | 0.08 | 0.03 | 0.02 | 0.03 | (allocated on Basis of GFAs) |
| 3 | Interest on Normative Debt | 9.49 | 6.76 | 0.57 | 2.16 | |
| 4 | Interest on Working Capital & Security Deposit | 4.40 | 1.57 | 1.14 | 1.70 | (Allocated on the Basis of Annual Fixed before Working capital Interest) |
| 5 | Depreciation & Related Debits | 28.43 | 10.00 | 7.51 | 10.93 | |
| 6 | Return on Equity | 56.31 | 19.47 | 16.10 | 20.74 | |
| 7 | Incentives | 11.89 | 4.23 | 3.07 | 4.59 | (Assumed all Hydro Stations at same Capacity Index of 94%) |
| 8 | Income Tax | 33.81 | 11.69 | 9.67 | 12.45 | (Allocated on Basis of ROEs) |
| 9 | Wheeling Charges Payable | | | | | |
| 10 | Stand-by Charges Payable | | | | | |
| **11** | **Gross Fixed Charges** | **215.23** | **76.61** | **55.56** | **83.06** | |
| **12** | Less:Non Tariff Income | 13.26 | 5.42 | 3.45 | 4.39 | Allocated on the basis of GFAs |
| **13** | Less: Income from Standby Charges | | | | | |
| **15** | **Net Fixed Charges** | **201.96** | **71.19** | **52.11** | **78.67** | |

या विभागाणीसाठी पायाभूत असलेल्या घटकांची तपशीलवार चर्चा ६. ५. १० या प्रकरणात करण्यात आली आहे.

### १. ५. ६ अन्य उत्पन्न

या आधी स्पष्ट केल्याप्रमाणे, टीपीसी- जीला भाडे, वैधानिक गुंतवणूक (रू. २९ कोटी) आदी दरव्यतिरिक्तचे उत्पन्न प्राप्त होते. त्याचप्रमाणे स्टँडबाय शुल्कापोटी आरईएलकडून प्राप्त होणारे रू. ९१ कोटी असे एकूण दरव्यतिरिक्त उत्पन्न रू. १२० कोटी एवढे आहे.

### १. ५. ७ टीपीसी- जी साठी एकूण वसूल करण्याजोगा महसूल

वर दिलेल्या माहितीवर आधारीत, टीपीसी- जी यांची एकूण वार्षिक महसुली आवश्यकता पुढीलप्रमाणे आहे.

### तक्ता १. १२ : आर्थिक वर्ष ०७ करिता टीपीसी- जी यांना एकूण वसूल

Rs. Crores

| Particulars | Energy Charges |
|---|---|
| Energy Charges | 2,374 |
| Annual Fixed Charge | 1,187 |
| **Gross Revenue Recoverable** | **3,561** |
| Less: Non-Tariff Income | 29 |
| Less: Income from Stand By Charges | 91 |
| **Net Revenue Recoverable** | **3,441** |

याशिवाय, प्रकरण ५ मध्ये निश्चित केल्यानुसार आर्थिक वर्ष ०६ साठीचा, एकूण रू. २८८ कोटींपर्यंतचा फरकही

वसूल करणे आवश्यक आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे, ही फरकाची रक्कम टीपीसी- जी यांच्या एआआरमध्ये जमा करण्यात आली आहे कारण ही रक्कम तीनही परवानाधारकांकडून प्राप्त करावयाची आहे.

**तक्ता : १. १३: आर्थिक वर्ष ०७ करिता टीपीसी- जी यांना एकूण वसूल**

Rs. Crores

| Particulars | FY07 |
|---|---|
| Base ARR for TPC-G | 3,441 |
| Gap Recoverable for FY06 | 288 |
| **Net Revenue Recoverable** | **3,729** |

परिणामी, टीपीसी- जी यांच्यासाठी, आर्थिक वर्ष ०७ करिता एकूण वसूल करण्याजोगा महसूल रू. ३७२९ कोटी एवढा आहे. यावर आधारीत, परवानाधारकांसाठीचा वीज निर्मिती दर हा रू. ४. ०२ प्रति युनिट एवढा होतो.

## १. २ टीपीसीच्या पारेषण व्यवसायासाठीची (टीपीसी- टी) महसुली आवश्यकता

मुंबईतील ग्राहकांना सेवा देणाऱ्या आरईएल, बीईएसटी आणि टीपीसी- डी या तीन वितरण परवानाधारकांना पारेषण स्वरूपाची सेवा टीपीसी- टी या कंपनीकडून दिली जाते. मुंबईतील ग्राहकांसाठीची विजेची गरज प्रामुख्याने टीपीसी- जी यांच्याद्वारे केली जाणारी वीज निर्मिती आणि उर्वरित विजेची अन्य बाहेरील स्त्रोतांकडून वीज खरेदी या प्रकारे पूर्ण केली जाते. टीपीसी- जी यांच्या वीज निर्मिती केंद्रातून केली जाणारी वीज निर्मिती तसेच अन्य बाहेरील स्त्रोतांकडून खरेदी केली जाणारी वीज टीपीसी- टी यांच्या वीज वाहिन्यांतून तीनही परवानाधारक वितरण कंपन्यांच्या वीज जाळ्यांपर्यंत वाहून नेली जाते. पारेषण जाळ्यासाठीचा खर्च हा यापूर्वी टीपीसी- जी या, टीपीसीच्या व्यवसायाचा अविभाज्य भाग मानला जात असे. पण, हे दोन खर्च वेगळे करण्याच्या सन्माननीय आयोगाच्या निर्देशांनुसार, पुढील परिच्छेदांमध्ये टीपीसी- टीची वार्षिक महसुली आवश्यकता स्वतंत्रपणे नमूद करण्यात आली आहे.

### १. २. १ वार्षिक पारेषण शुल्क

दर नियामक तरतुदींमध्ये नमूद केल्याप्रमाणे, वितरण परवानाधारकांकडून पारेषण परवानाधारकाने आकारावयाचा दर पुढील परिच्छेदांमध्ये वार्षिक पारेषण शुल्क या स्वरूपात निश्चित करण्यात आला आहे.

**वार्षिक पारेषण शुल्क निश्चित करताना त्यात पुढील बाबींचा एकत्रित विचार केला जातो.**

- संचालन आणि देखभाल खर्च
- वैधानिक कर्जांवरील व्याज
- खेळत्या भांडवलावरील व्याज
- घसारा
- वैधानिक भाग भांडवलावरील परतावा

- आयकर

दरांव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि वीज वहनातून प्राप्त होणारे उत्पन्न हे वर निश्चित केलेल्या वार्षिक महसुली आवश्यकतेनुसार आहे आणि त्या आधारे तीन परवानाधारकांना वसूल करण्याजोगा महसूल निश्चित करण्यात आला आहे.

### १. २. १. १ भांडवली खर्चाची योजना

आर्थिक वर्ष ०७ मध्ये भांडवली खर्च योजनांसाठी एकूण रू. ६८ कोटी एवढी तरतूद टीपीसीने केली आहे. मागील वर्षाच्या, पुढे चालविलेल्या योजना तसेच आर्थिक वर्ष ०७ साठीच्या भांडवली खर्चाच्या योजना यांचा संयुक्त खर्च म्हणून हा आकडा गृहित धरण्यात आला आहे. या खर्चाचा तपशील असाः

**तक्ताः १. १४ आर्थिक वर्ष ०७ साठी प्रस्तावित भांडवली खर्च**

Rs. Crores

| Particulars | Expenditure FY07 |
|---|---|
| Expenditure on Carry Forward Schemes | 34 |
| Expenditure in New Schemes | 27 |
| Contingency Provision @ 1% | 1 |
| **Total** | **62** |

### १. २. १. २ संचालन आणि देखभाल खर्च

टीपीसी- टी चा आर्थिक वर्ष ०७ साठीचा संचालन आणि देखभालीपोटीचा खर्च यामगील वर्षांसाठीच्या प्रत्यक्ष आकडेवारीच्या आधारे रू. ९० कोटी एवढा निश्चित करण्यात आला आहे.

### १. २. १. ३ वैधानिक कर्जांवरील व्याज

भांडवली खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी सन्माननीय आयोगाने कर्ज आणि भाग भांडवल यांचे ७० : ३० असे प्रमाण निश्चित केलेले आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष ०४, ०५ आणि ०६ साठी व्याजही निश्चित करण्यात आला आहे. टीपीसी- टी ने आर्थिक वर्ष ०७ साठी हेच धोरण कायम ठेवले आहे.वर उल्लेख केलेली रक्कम वगळता (रू. ६२ कोटीच्या ७० टक्के ) उर्वरित कर्जासाठीचा खर्च १० टक्के या दराने (आर्थिक वर्ष ०४ आणि ०५ साठीच्या दर आदेशांनुसार), आर्थिक वर्ष ०७ साठी एकूण रू. ४ कोटी एवढे अंदाजित आहे. याशिवाय, आर्थिक वर्ष ०४, ०५ आणि ०६ साठी मंजूर कर्जावरील वैधानिक व्याज आणि कर्जाच्या परतफेडीसाठी, आयोगाच्या आदेशांनुसार आठ वर्षांचा कालावधी लक्षात घेता त्याची रक्कम रू. ३ कोटी असा गृहित धरण्यात आला आहे. त्यानुसार भांडवली खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी वैधानिक कर्जावरील व्याज हे एकूण रू. ७ कोटी एवढे होते.

### १. २. १. ४ खेळत्या भांडवलावरील व्याज

आयोगानेअधिसूचित केलेल्या नियमावलीमध्ये खेळते भांडवल निश्चित करण्यासाठी कोणते घटक गृहित धरावेत ते स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे पारेषण कंपन्यांना स्थिर खर्च म्हणून त्यावरील व्याज जमा करण्यासही परवानगी देण्यात आली आहे. यासंदर्भात व्याजाची गणना करण्यासाठीचा व्याज दर कसा निश्चित करावा यासंदर्भात स्टेट बँक ऑफ इंडियाचा प्राइम लेंडिंग रेट आधारभूत मानण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

वर उल्लेखित तरतुदीच्या आधारे आर्थिक वर्ष ०७ साठीचे खेळत्या भांडवलावरील व्याज हे रू. ४ कोटी आहे.

### १. २. १. ५ घसारा

आयोगाने दर नियमावलीमध्ये घसाऱ्यासाठीचे नवीन नियम निर्देशित केले आहेत. टीपीसी– टी करिता आर्थिक वर्ष ०७ साठी घसाऱ्याचा हिशोब या दरांच्या आधारे, स्ट्रेट लाइन पद्धतीने काढण्यात आला असून ही रक्कम **रू. ३० कोटी** एवढी आहे.

### १. २. १. ६ वैधानिक भागभांडवलावरील परतावा

नवीन नियमावलीनुसार पारेषण परवानाधारक कंपनीला आपल्या व्यवसायात गुंतविलेल्या भाग भांडवलावर १४ टक्के दराने परतावा प्राप्त करण्याची परवानगी आहे. पारेषण व्यवसायाकरिता, भाग भांडवलाच्या विभागणीच्या आधारे केलेल्या हिशोबानुसार भाग भांडवलावरील परतावा **रू. ६० कोटी** एवढा आहे.

### १. २. १. ७ आयकर

आर्थिक वर्ष ०७ साठी करांचा विचार करताना, भाग भांडवलाच्या परताव्यावर देय असलेले कर विचारात घेण्यात आले आहेत. त्याच बरोबरीने देय सवलती तसेच वैधानिक समायोजन यांचाही विचार करण्यात आला असून एकूण कर हा **रू. २६ कोटी** एवढा होतो. मालमत्तेचे टॅक्स डब्ल्यूडीव्ही तसेच आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदी यू/एस १४ ए, ३२ ए, ४३ ए आणि ४३ बी यानुसार कराचा हिशोब करण्यात आला आहे.

### १. २. १. ८ वार्षिक पारेषण खर्चाचा सारांश

पारेषण व्यवसायाकरिता आर्थिक वर्ष ०७ साठी वार्षिक पारेषण खर्चाचा सारांश पुढीलप्रमाणे :

**तक्ता : १. १५: टीपीसी– टी करिता आर्थिक वर्ष ०७ साठी वार्षिक पारेषण खर्च**

**Rs. Crores**

| Particulars | Fixed Charges |
|---|---|
| O&M Charges | 90 |
| Interest on Normative Debt | 7 |
| Interest on Working Capital | 4 |
| Depreciation | 30 |
| Return on Equity | 60 |
| Income Tax | 26 |
| **Annual Transmission Charges** | **217** |

### १. २. १. ९ वीज वहना द्वारे उत्पन्न

महाराष्ट्र राज्य वीज मंडळासाठी वीज वहनासाठीचे शुल्क रू. २. ९९ प्रति केव्हीएच अधिक एफओसीएच्या रू. ०. २५ प्रति केव्हीएच आणि या शिवाय निश्चित मासिक शुल्क रू. ६७ लाख या प्रकारे निश्चित केले जाते. आर्थिक वर्ष ०७ साठी या रकान्यातील अंदाजित रक्कम **रू. २४ कोटी** एवढी आहे.

### १. २. १. १० दराव्यतिरिक्तचे उत्पन्न

दर नियमावलीत अशा प्रकारच्या जुळवणीसाठी कोणतीही तरतूद नसली तरी, दरांव्यतिरिक्त प्राप्त होणारे काही उत्पन्नही ग्राहकांकडे लाभ स्वरूपात हस्तांतरित करण्याची टीपीसीची परंपरा आहे. ग्राहकांना अशाच प्रकारचा लाभ यापुढेही देण्याच्या धोरणातून तेवढी रक्कम टीपीसी- टी च्या वार्षिक पारेषण खर्चातून वेगळी काढण्यात आली आहे. पारेषण व्यवहारांकरिता, आर्थिक वर्ष ०७ साठी दर व्यतिरिक्तचे अंदाजित उत्पन्न **रू. ९ कोटी** एवढे आहे.

### १. २. २ टीपीसी- टी साठी एकूण वसूल करण्याजोगा महसूल

वर उल्लेखित आकडेवारीच्या आधारे टीपीसी- टीकरिता, आर्थिक वर्ष ०७ साठी एकूण वसूल करण्याजोगा महसूल पुढीलप्रमाणे :

**तक्ता १. १६ : आर्थिक वर्ष ०७ साठी टीपीसी- टी करिता एकूण वसूल करण्याजोगा महसूल**

Rs. Crores

| Particulars | Energy Charges |
|---|---|
| Annual Fixed Charge | 217 |
| **Gross Revenue Recoverable** | **217** |
| Less: Non-Tariff Income | 9 |
| Less: Income from Wheeling | 24 |
| **Net Revenue Recoverable** | **184** |

वर निर्देशित केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष ०७ साठी एकूण वसूल करण्याजोगा महसूल **रू. १८४** कोटी एवढा आहे. टीपीसी- टी आणि आरईएल, बीईएसटी आणि टीपीसी- डी यांच्यातील पारेषण पुरवठा कराराला अंतिम रूप दिले जाईपर्यंत हा खर्च तीन परवानाधारकांत, त्यांनी खरेदी केलेल्या युनिट्सच्या संख्येच्या प्रमाणात सामायिक पद्धतीने विभागला जाईल असे गृहित धरण्यात आले आहे.

### १. ३ टीपीसीच्या वितरण व्यवसायासाठीची (टीपीसी- डिस्ट्रिब्यूशन म्हणजेच टीपीसी- डी) महसुली आवश्यकता

टीपीसीने आपला सर्वसमावेशक परवाना सन्माननीय आयोगाला सादर केला आहे जेणेकरून वीज कायदा तसेच अन्य नियमावलींनुसार त्यात आवश्यक आणि योग्य ते बदल करणे शक्य होईल. दरम्यान, आयोगाने टीपीसीला, काही विशिष्ट श्रेणीतील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी तात्पुरती मनाई केलेली आहे. आयोगाने मागितलेला

सर्व तपशील टीपीसीने सादर केलेला आहे, त्यामुळे ही तात्पुरती मनाई उठविली जाईल असे गृहित आहे. त्याचवेळी, असेही अपेक्षित आहे की, सेवेचे कर्तव्य (डीटीएस) पूर्णत्वाने पार पाडण्यासाठी सन्माननीय आयोग पुरेसा अवधीही देईल. त्यामुळे, विजेच्या आवश्यकतेसंदर्भातील अंदाज एकूण विक्री ही सध्या असलेल्या कलानुसार विभागण्यात आला आहे.

वर उल्लेख केलेल्या घटकांच्या आधारे वितरण कार्यासाठी वार्षिक महसुली आवश्यकतेचा अंदाज काढण्यात आला असून पुढील भागात तो तपशीलवार नमूद करण्यात आला आहे.

## १. ३. १ विजेची आवश्यकता

टीपीसी- डी साठीची विजेची आवश्यकता पारंपारिक कल आणि प्रमाण यांच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे. टीपीसी- डी ची अंदाजित विक्री २३९३ एमयू एवढी आहे. वितरणातील तोटा, मागील आकडेवारीच्या आधारे, ४. ४३ टक्के असा गृहित धरण्यात आला आहे आणि त्यानुसार एकूण विजेची गरज, वितरण जाळ्यात प्रवेश करतेवेळी २५०४ एमयू एवढी अंदाजित आहे.

ही एकूण विजेची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी टीपीसी- डी चा, टीपीसी- डी च्या एकूण वीज निर्मितीमधील हिस्सा आणि आवश्यकता पडल्यास अतिरिक्त वीज खरेदी असे दोन मार्ग प्रस्तावित आहेत. टीपीसी- डी द्वारे आरईएल आणि बीईएसटी यांच्यासाठीही वीज खरेदी केली जाते. हा व्यवहार टीपीसी- टीच्या क्षेत्राच्या सीमारेषेबाहेर केला जात असल्याने त्याचा विचार टीपीसी- डीच्या एकूण वीज आवश्यकतेच्या संदर्भात केलेला नाही.

## १. ३. २ भांडवली खर्चाची योजना

भांडवली खर्चासाठी एकूण रू. ९४ कोटी एवढी गुंतवणूक करण्याचा टीपीसीचा प्रस्ताव आहे. यापैकी, रू. ६२ कोटी एवढी रक्कम नवीन योजनांसाठी गुंतविली जाणार आहे.

## १. ३. ३ टीपीसी- डीची वार्षिक महसुली आवश्यकता

नियमाावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे वितरण परवाना कंपनीसाठी महसुली आवश्यकता निश्चित करताना पुढील घटकांचा विचार केला जातो. :

- वीज खरेदीचा खर्च
- संचालन आणि देखभाल खच
- वैधानिक कर्जावरील व्याज
- खेळत्या भांडवलावरील व्याज
- घसारा
- संशयास्पद आणि वाईट कर्जासंदर्भातील तरतूद

- वैधानिक भाग भांडवलावरील परतावा
- आयकर
- वैधानिक जुळवणी

वर उल्लेखित केलेल्या एकूण महसुली आवश्यकतेचा विचार करताना ही रक्कम दरव्यतिरिक्तच्या उत्पन्नापासून वेगळी काढण्यात आली आहे आणि ही रक्कम ग्राहकांकडून वसूल करण्याजोगी महसुली आवश्यकता म्हणून प्रस्तावित करण्यात आली आहे.

- **वीज खरेदीचा खर्च**

टीपीसी- डी करिता, आर्थिक वर्ष ०७ साठीचा वीज खरेदीचा खर्च रू. १६२० कोटी असा गृहित धरण्यात आला असून त्यात टीपीसी- जी कडून केली जाणारी खरेदी , स्वतःच्या गरजेसाठी टीपीसी- डीचे आरपीओ यांच्याकडून केली जाणारी खरेदी, स्वतःच्या गरजेसाठी, आरईएल किंवा बीईएसटी यांच्या गरजेसाठी टीपीसी- डी किंवा आरपीओ यांच्यापेक्षा वेगळ्या स्त्रोताकडून खरेदी यांचा समावेश आहे.

- **टीपीसी- टी यांना देय असलेले पारेषण शुल्क**

टीपीसी- जी आणि अन्य स्वतंत्र स्त्रोतांकडून केली जाणारी वीज खरेदी टीपीसी- टी यांच्या पारेषण वाहिन्यांद्वारे वाहून आणावी लागते. या वहन यंत्रणेच्या वापराचा मोबदला म्हणून टीपीसी- टी यांना पारेषण शुल्क द्यावे लागते. प्रकरण १. ६. २ मध्ये नमूद केलेल्या एकसमानीकरणाच्या तत्वानुसार टीपीसी- डी द्वारे, टीपीसी- टी यांच्या पारेषण जाळ्याद्वारे वहन केल्या जाणाऱ्या विजेतील त्यांच्या हिश्श्याबद्दलचे शुल्क हे रू. ४२ कोटी एवढे आहे.

- **संचालन आणि देखभाल खर्च**

मागील काळाची आकडेवारी लक्षात घेऊन संचालन आणि देखभाल खर्च **रू. २४ कोटी** असा अंदाजित आहे.

- **वैधानिक कर्जांवरील व्याज**

आयोगाने कर्ज आणि भाग भांडवल यांचे वैधानिक प्रमाण ७०: ३० असे निश्चित केले आहे. त्यानुसार, रू. ९४ कोटी या प्रस्तावित गुंतवणुकीपैकी, वैधानिक कर्ज स्वरूपाचा हिस्सा, आर्थिक वर्ष ०७ साठी रू. ६६ कोटी एवढा आहे. या कर्जारील व्याजाचा खर्च १० टक्के दराने (आर्थिक वर्ष ०४ आणि आर्थिक वर्ष ०५ साठीच्या दर आदेशानुसार), आर्थिक वर्ष ०७ साठी रू. ७ कोटी एवढा आहे. आर्थिक वर्ष ०४, ०५ आणि ०६ साठी मंजूर करण्यात आलेल्या वैधानिक कर्जांचा परतफेडीचा अवधी, आयोगाच्या आदेशांनुसार ८ वर्षांचा आहे, हे लक्षात घेऊन टीपीसीने या कर्जांवरील व्याज म्हणून रू. ४ कोटी एवढी रक्कम गृहित धरण्यात आली आहे. याशिवाय, दर नियमावलीनुसार ग्राहकांच्या सुरक्षा अनामत रकमेवरील देय व्याज म्हणून, ६ टक्के या व्याज दराने रू. ३ कोटी अशी तरतूद करण्यात आली असून व्याज स्वरूपातील एकूण खर्च हा **रू. १४ कोटी** एवढा अंदाजित आहे.

- **खेळत्या भांडवलावरील व्याज**

  आयोगाने अधिसूचित केलेल्या नियमावलीत खेळते भांडवल ठरविण्यासाठीची पद्धती स्पष्ट करण्यात आली आहे. या पद्धतीने केलेल्या हिशोबानुसार आर्थिक वर्ष ०७ साठी, खेळत्या भांडवलावरील एकूण व्याज **रू. ७ कोटी** एवढे आहे.

- **घसारा**

  आयोगाने दर नियमावलीत घसाऱ्यासाठीचे नवीन दर नमूद केलेले आहेत. आर्थिक वर्ष ०७ साठीच्या सुरूवातीला असलेल्या एकूण स्थिर मालमत्तेच्या आधारे, आर्थिक वर्ष ०७ मधील भांडवलीकरनुसार विभागून आणि त्यामार्गे, आर्थिक वर्ष ०७ साठी प्रत्यक्ष घसारा निश्चित करण्यासाठी हा दर स्ट्रेट लाइन पद्धतीने लागू करण्यात आला आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष ०७ साठीची घसाऱ्याची रक्कम ही **रू. १५ कोटी** अशी अंदाजित आहे.

- **संशयास्पद आणि वाईट कर्जासंदर्भातील तरतूद**

  टीपीसी- डीने आर्थिक वर्ष ०७ करिता यापूर्वीच्या आकडेवारीच्या आधारे आणि आयोगाने दिलेल्या परवानगीनुसार संशयास्पद आणि वसूल न झालेल्या कर्जासंदर्भात **रू. २ कोटी** एवढी तरतूद केली आहे.

- **वैधानिक भागभांडवलावरील परतावा**

  नवीन नियमावलीनुसार वीज वितरण कंपनीला व्यवसायात गुंतविलेल्या भाग भांडवलावर परतावा प्राप्त करता येतो. सन्माननीय आयोगाला सादर केलेल्या, टीपीसीच्या, विविध व्यवसाय विभागांसाठीच्या वाटपाच्या आधारे आर्थिक वर्ष ०घ साठी वैधानिक भाग भांडवलावरील परतावा म्हणून **रू. २५ कोटी** अंदाजित आहेत.

- **आयकर**

  भागभांडवलावरील परताव्यावर आयकर कायद्यातील तरतुदींनुसार लागू असलेला कर तसेच आवश्यक ती जुळवणी अशी आयकरासाठी एकूण **रू. १३ कोटी** एवढी तरतूद करण्यात आली आहे.

- **वैधानिक जुळवणी**

  दर नियमावलीतील तरतुदीनुसार आकस्मिक कारणांसाठीची राखीव तरतूद म्हणून टीपीसी- डी करिता आर्थिक वर्ष ०७ मध्ये एकूण **रू. २ कोटी** अंदाजित करण्यात आले आहेत.

- **दरांव्यतिरिक्तचे उत्पन्न**

  टीपीसीच्या वितरणव्यवसायातून भाडेरक्कम, वैधानिक गुंतवणूकीतून मिळणारे उत्पन्न यांच्या स्वरूपात रू. २ **कोटींचे** करमुक्त उत्पन्न मिळते.

- **व्यापाराद्वारे उत्पन्न**

  टीपीसी – जी व्यतिरीक्त अन्य स्त्रोतांकडून उर्जाखरेदी करताना बेस्ट आणि आरईएल यांच्याकडून देण्यात येणारी प्रमाणशीर दरातील उत्पन्न तसेच प्रति युनिट ४ पैसे इतके ट्रेडिंग मार्जिन यांचा समावेश यामध्ये होतो. एकूण अंदाजित व्यावसायिक उत्पन्न **रू.५८२** कोटी इतके आहे.

  वरील माहितीच्या आधारे वितरण व्यवसायातील वसुलक्षम एआरआर **रू.११८० कोटी** असून त्याचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :

### १. ३. ४ आर्थिक वर्ष २००७ करता टीपीसी – डी चे एआरआर

**तक्ता १ – १७ : टीपीसी – डी चे एआरआर**

**Rs. Crores**

| Particulars | FY07 (Projected) |
|---|---|
| Power Purchase Cost - TPC-G & RPO | 870 |
| Power Purchase Cost - External Sources | 750 |
| Transmission Charges Payable | 42 |
| Operation & Maintenance Expense | 24 |
| Interest on Regulatory debt | 11 |
| Interest on Working Capital & Security Deposit | 10 |
| Depreciation | 15 |
| Provision for Bad & Doubtful Debts | 2 |
| Return on Equity | *25* |
| Income Tax | *13* |
| Statutory Appropriations | *2* |
| **Gross Annual Revenue Requirement** | **1,764** |
| Less: Non-Tariff Income | 2 |
| Less: Income from Trading | 582 |
| **Net Annual Revenue Requirement** | **1,180** |

दररचना प्रस्तावामध्ये आरेखित केल्याप्रमाणे उपरोल्लेखित आर्थिक वर्ष २००७ च्या एआरआर ची वसुली टीपीसी – डी च्या ग्राहकांकडून समप्रमाणात करण्याचा प्रस्ताव आहे.

### १. ४ दरआकारणीविषयी भूमिका

उर्जानिर्मिती आणि पारेषणाकरता दरआकारणी करण्यासंबंधीचे प्राथमिक तत्व निश्चित करताना बेस्ट, आरईएल

आणि टीपीसी यांच्या परवानाक्षेत्रातील वितरण व्यवसायामध्ये समान आणि नि:पक्षपाती दरआकारणी केली जाईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.

परवानाधारक कंपन्यांना समान वागणूक दिली जावी या उद्देशाने उर्जानिर्मिती आणि पारेषणाचे एकंदरीत वसुलक्षम उत्पन्न तीनही कंपन्यांकडून समान प्रमाणात वसुल केले जावे असे गृहित धरले आहे. एनटीपीसी सारख्या केंद्रीय उर्जानिर्मिती कंपन्यांमध्येही उत्पन्नवसुलीकरता याच पद्धतीचा अवलंब केला जातो आणि राज्य स्तरावरील उर्जा कंपन्यांमध्ये कॅपॅसिटी आणि उर्जा शुल्काची विभागणी केली जाते. सध्या अस्तित्वात असलेले पीपीए / एमओयू/ करार यांच्या मुदतवाढीविषयी अटी आणि शर्ती यांच्याविषयीच्या वाटाघाटी प्रलंबित असल्याने अशाप्रकारे समान वितरणामुळे सुलभ कार्यात्मकतेचा अवलंब करता येऊ शकेल आणि याप्रकारचे नियम प्रथमच लागू केले जात असल्यामुळे तसेच नवीन कार्यपद्धती सहजपणे अंगीकारण्याची आवश्यकता असल्यामुळे ही सुलभ कार्यात्मकता महत्वाची ठरते. दोन प्रकारच्या दररचनेचा अवलंब करण्यापूर्वी आणि उपलब्धतेवरील आधारित दररचनेपूर्वी केंद्रीय उर्जानिर्मिती कंपन्यांकडून उर्जानिर्मिती खर्च विभागणी करण्यासाठी याच पद्धतीचा वापर केला जात असे याची नोंद इथे घ्यायला हवी.

### १.४.१ टीपीसी– जी यांच्या करिता आर्थिक वर्ष २००७ करता निर्मिती खर्चाची वसुली

निर्मिती खर्चाची वसुली वितरणविषयक परवानाधारक कंपन्यांकडून कायमस्वरूपी शुल्क आणि उर्जा शुल्क अशा दोन प्रकारात करण्याची तरतूद अटी आणि शर्तींमध्ये केली असून उत्पन्नवसुली सध्याच्या दरआकारणी पद्धतीनुसार केली जाते. निर्मिती खर्चाची वसुली करण्याच्या जुन्या पद्धतींचा नवीन नियमांशी ताळमेळ घालण्याकरता नियमित उर्जानिर्मिती करणाऱ्या कंपनीकडून इंधनांच्या दरातील कोणताही बदल उर्जा शुल्कामध्ये सामावून घेतला जातो आणि त्यामुळे टीपीसी – जी च्या दररचनेमध्ये कोणतेही एफएसी शुल्क लागू करण्याची आवश्यकता नाही.

आर्थिक वर्ष २००७ मधील एकंदरीत वसुलक्षम उत्पन्न रू.३७२९ कोटी इतके असून तीनही परवानाधारक कंपन्यांकडून ते पुढीलप्रमाणे वसूल केले जाणे आवश्यक आहे.

### तक्ता १– १८ टीपीसी – जी चे वसुल करण्याजोगे उत्पन्न

| | Unit | Total | REL | BEST | TPC-D |
|---|---|---|---|---|---|
| Units sold to Licensee (T-D Interface) | MUs | **9,268** | 3,505 | 3,626 | 2,138 |
| Energy Charge | Rs Crores | **2,374** | 898 | 929 | 548 |
| Annual Fixed Charge | Rs Crores | **1,187** | 449 | 464 | 274 |
| Less: Non-Tariff Income | Rs Crores | **120** | 45 | 47 | 28 |
| Add: Past Recovery for FY06 | Rs. Crores | **288** | 109 | 113 | 67 |
| **Recoverable Revenue** | **Rs Crores** | **3,729** | **1,410** | **1,459** | **860** |
| | | | | | |
| Energy Charge | Rs/kWh | **2.56** | 2.56 | 2.56 | 2.56 |
| Annual Fixed Charge (Net of Non-Tariff Income) | Rs/ kWh | **1.46** | 1.46 | 1.46 | 1.46 |
| **Recoverable Revenue** | **Rs/ kWh** | **4.02** | **4.02** | **4.02** | **4.02** |

### १.४.२ २००७ या आर्थिक वर्षाकरता उर्जानिर्मिती दर प्रस्ताव

टीपीसी – जी करता दर प्रस्ताव पुढे सादर केला आहे.

### १.४.२.१ २००७ या आर्थिक वर्षाकरता उर्जानिर्मिती दररचनेचे सामान्यीकरण

तिन्ही परवानाधारक कंपन्यांतर्फे महसूल वसुली तसेच दरविषयक इतर घटकांसंबंधी समान भूमिका घेण्यात यावी असा प्रस्ताव आहे. आरईएल आणि बेस्ट या कंपन्यांतर्फे करण्यात येणारी महसुल वसुली मागणी शुल्क (डिमांड चार्ज) आणि उर्जा शुल्क (एनर्जी चार्ज) या प्रचलित पद्धतीवर आधारित असेल. टीपीसी – डी च्या परवाना क्षेत्रातील टीपीसी – डी ची महसुल वसुली वितरण एआरआर अंतर्गत उर्जा खरेदी दरानुसार ठरवण्यात आली आहे.

### शुल्क वसुली – पुनर्रचना

कायमस्वरूपी शुल्क मागणी शुल्काच्या माध्यमातून शक्य त्या प्रमाणात वसुल करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र परवानाधारक कंपन्यांकरता निश्चित करण्यात येणारे मागणी शुल्क टीपीसी – डी च्या थेट ग्राहकांपेक्षा कमी असावे या विचारातून या प्रयत्नांवर मर्यादा आल्यामुळे मागणी शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल शक्य दिसत नाही. मागणी शुल्क निश्चितीच्या मुद्याचा विचार करता अनुरूप कमाल मागणी ऐवजी वैयक्तिक कमाल मागणीच्या आधारावर परवानाधारक कंपन्यांना देयक आकारण्याचा प्रस्ताव आहे. मात्र परवानाधारकांकडून कायमस्वरूपी शुल्काच्या वसुलीचे प्रमाण वाढविण्याकरता प्रति केव्हीए कमाल मागणी शुल्काचा दर प्रचलित पातळीपेक्षा कमी करण्यात आला आहे. टीपीसी – डी च्या संदर्भात प्रस्तावित करण्यात येत आहे की टीपीसी – डी ला टीपीसी – जी कडून उर्जा शुल्कावर स्थानांतर दरआकारणीच्या आधारे (ट्रान्सफर प्राईसिंग) देयक आकारले जाईल. पुरवठा केल्या गेलेल्या विजेची निश्चिती तात्पुरत्या स्वरूपात मागील महिन्यात, टीपीसी– डी ने केलेल्या वीज विक्रीच्या आधारावर केली जाईल आणि नंतर २००७ या आर्थिक वर्षाच्या एआरआर नुसार अंदाजित वितरण तोटा जो असेल त्यानुसार त्याची प्रत्यक्ष जुळवणी केली जाईल. इतर दोन्ही परवानाधारक

कंपन्यांना सारख्याच पद्धतीने मागणी आणि उर्जा शुल्क आकारण्याचा आयोगाचा मानस असल्यास सदर कंपन्यांना देण्यात येणारा मागणीपुरवठा आणि उर्जापुरवठयाचे मापन करण्यासाठी मीटर बसविण्याकरता १२ महिन्यांचा कालावधी माननीय आयोगाने द्यावा अशी टीपीसीची अपेक्षा आहे, अशा प्रकारची कोणतीही यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. १२ महिन्यातील माहितीचा आढावा घेऊन त्याच्या आधारे टीपीसी सूचित करू इच्छिते की टीपीसी इतर दोन्ही परवानाधारक कंपन्यांच्या (आरईएल आणि बेस्ट) दर पद्धतीशी तुलनात्मक अशी दरपद्धत आयोगाकडे सादर करेल.

### १.४.२.२ टीपीसी – जी च्या दरआकारणीतील घटक

उपरोल्लेखित आराखडयानुसार २००७ या आर्थिक वर्षातील टीपीसी – जी च्या वसुलक्षम उत्पन्नाशी संबंधित दरआकारणीचे सध्याच्या दररचनेनुसार दोन घटक असतील :

- मागणी शुल्क
- उर्जा शुल्क

तीनही प्रस्तावित शुल्कांनुसार सदर दोन्ही घटकांची रुपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

#### १.४.२.२.१ मागणी शुल्क

सध्याचे आरईएल आणि बेस्ट या कंपन्यांना समान पातळीवर ठेवण्याकरता त्यांना आकारले जाणारे रू.३४० / केव्हीए प्रति महिना हे मागणी शुल्क काही प्रमाणात कमी करण्यात आले असून त्यांना अन अनुरूप मागणी म्हणजेच सर्व ड्रॉअल पॉइन्ट्सवरील अतिरीक्त कमाल मागणीनुसार देयक आकारले जाईल. टीपीसी – डी ला आकारले जाणारे मागणी शुल्काकरता सध्या ग्राहकांकडून केल्या जाणाऱ्या कमाल मागणीचे मापन केले जात असून तेही सर्व ग्राहकांना लागू होत नाही. त्यामुळे टीपीसी – डी ला आवश्यक असणाऱ्या एकंदरीत कमाल मागणीचे संपूर्ण मूल्यमापन करेपर्यंत मागणी शुल्काची दरआकारणी करणे योग्य नसल्यामुळे त्याविषयी कोणताही प्रस्ताव सादर केला गेलेला नाही.

अन्य पर्यायानुसार अनुरूप मागणीसंदर्भातील सध्याची पद्धत पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव ठेवल्यास त्याकरता अंतिम मागणी शुल्क रू.३६५/केव्हीए / प्रति महिना असे आकारले जाईल.

बोरिवली येथील २२० केव्ही क्षमतेची आंतरजोडणी ही आरईएल ला पर्यायी उर्जापुरवठा उपलब्ध करून देण्याकरता आहे. मराविमला देण्यात येणाऱ्या पर्यायी उर्जा पुरवठा शुल्काची विभागणी करण्याबाबत टीपीसी आणि आरईएल यांच्यामध्ये न्यायालयीन वाद चालू असून त्यामुळे टीपीसीने आरईलकरता मागणी शुल्काचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

#### १. ४. २. २. २ उर्जा शुल्क

टीपीसी – जी ला प्रत्येक परवानाधारक कंपनीकडून मिळणाऱ्या वसुलक्षम उत्पन्नातील आवश्यक भाग मिळण्यासाठी समतोल साधण्याकरता तीनही परवानाधारक कंपन्यांसाठी हे उर्जा शुल्क लागू केले गेले आहे. त्यानुसार बेस्टला आकारले जाणारे उर्जा शुल्क टीपीसी – जी चे वसुलक्षम उत्पन्न लक्षात घेऊन आणि मागणी

शुल्क आणि एफएसी शुल्काच्या आधारे लागू केले गेले आहे. टीपीसी – डी करता उर्जानिर्मिती वसुलक्षम उत्पन्नावर आधारित उर्जा शुल्क लागू केले गेले आहे.

आरईएलकरता बेस्टबरोबर समान पातळी कायम राखण्यासाठी बेस्टच्या व्होल्टेजनुसार २२/ ३३ केव्ही उर्जा शुल्क लागू केले आहे. २२० केव्ही चे उर्जा शुल्काकरता सध्याच्या दर नियमांवर आधारित सध्याची दर आकारणी ÷ ज्यामध्ये २२ / ३३ केव्ही च्या उर्जा शुल्कास ५ टक्के सूट देण्याची अट लागू आहे – त्यानुसार आरईएलकडून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये रू.७६ कोटींची तूट येऊन तीनही परवानाधारक कंपन्यांमध्ये असमतोल निर्माण होतो. तीनही परवानाधारक कंपन्यांना समान पातळीवरील वागणूक देण्याकरता आरईएलकडून उपरोल्लेखित उत्पन्नाची वसुली पुढील पर्यायांनुसार करणे आवश्यक आहे.

**पर्याय –१**

२२० केव्ही च्या दरआकारणीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. पर्यायी उर्जापुरवठा व्यवस्था आणि मागणी शुल्काची आकारणी न करणे या बाबी लक्षात घेऊन २२० केव्ही चे उर्जा शुल्काची पुनर्रचना करण्यात आली असून त्यातून टीपीसी – जी ला आरईएल कडून मिळणाऱ्या वसुलक्षम उत्पन्नाची पूर्ण वसुली करण्यात येईल याची व्यवस्था करण्यात आली आहे.

वरील तत्वानुसार आरईएलला आकारण्यात येणारे २२० केव्हीचे पुनर्रचित अपरिशिष्टित उर्जा शुल्क ३८० पैसे प्रति युनिट इतके अंदाजित करण्यात आले आहे. ईएचव्ही व्होल्टेज नुसार सूट लागू केल्यास सदर उर्जा शुल्कामध्ये वाढ करावी लागेल.

**पर्याय –१ ए**

दरआकारणीतील उपरोल्लेखित पुनर्रचना स्वीकारण्यात न आल्यास टीपीसी – जी वसुलीतील रू.६८ कोटींच्या कमतरतेची भरपाई तीनही परवानाधारक कंपन्यांकडून करावी लागेल (यामुळे आरईएल ला इतर दोन परवानाधारक कंपन्यांच्या तुलनेत अवाजवी दरविषयक लाभ मिळत असला तरी) आणि त्यामुळे प्रत्येक परवानाधारक कंपनीस अंदाजे ७ पैसे प्रति युनिट इतका वाढीव दर लागू केला जाईल.

**पर्याय –२**

टीपीसी आणि आरईएल यांच्यातील करारातील नियमांवर (पीओए) आधारित एक वैकल्पिक पर्याय सुचविण्यात आला आहे. २२० केव्ही ही सुविधा डहाणू येथील युनिट्स आउटेजला पूरक ठरावी याकरता असून सदर आउटेजमधील आणि सामान्य परिस्थितीतील ड्रॉअलमध्ये फरक करून त्यानुसार भिन्न दरआकारणी करण्यात यावी असा प्रस्ताव आहे. प्रस्तावित दरआकारणी ही डहाणू येथील युनिट्सचे आउटेजमुळे वार्षिक आवश्यकता २५० एमयूइतकी असेल या गृहितावर आधारित आहे. या पर्यायानुसार उर्जा शुल्क पुढीलप्रमाणे असेल.

**प्रथम २५० एमयू करता :** उर्जा शुल्क रू.२.०० / केडब्ल्यू एच, म्हणजेच २२/ ३३ केव्ही उर्जा शुल्कावर ५ टक्के सूट लागू करून आकारले जाईल.

**उर्वरित एमयूकरता** : अपरिशिष्टित उर्जा शुल्कानुसार तीनही परवानाधारक कंपन्यांना समान वागणूक देण्याकरता रू.४.०९ प्रति केडब्ल्यूएच.

**तक्ता – १.१९ उत्पन्न वसुली – पर्याय –२**

| | Total Revenue (Rs. Crores) | Sales (MU) / Maximum Demand (MVA) | Tariff (Ps./kWh) |
|---|---|---|---|
| **Total Revenue Requirement from REL** | **1,410** | | |
| Revenue from Demand Charges @ 22/33 kV | 245 | 7,546 | 325 |
| **Revenue to be recovered through Energy Charges** | **1,165** | | |
| Energy Sale and Revenue @ 22/33 kV | 807 | 2,563 | 315 |
| 220 kV Stand By Support - During Dahanu TPS Outage | 75 | 250 | 299 |
| **Balance Revenue to be recovered** | **283** | **2,813** | |
| Estimated Sales at 220 kV - Normal Supply | | 691 | |
| Estimated Per Unit Charge at 220 KV for Normal Supply | | | 409 |
| **Total Recovery** | **283** | | |

टीपीसी – जी इथे नमूद करू इच्छिते की पर्याय १ (मूळ केस) मध्ये व्यवस्थापन सुलभता मिळू शकते तसेच सर्व परवानाधारक कंपन्यांना समानपातळीवर आणू शकते आणि म्हणून सदर पर्यायाचा विचार करण्यात यावा अशी विनंती माननीय आयोगास करते.

### १.४.२.३ परवानाधारक कंपन्यांना लागू होणारी दररचना

मूळ प्रकरणांतर्गत मागणी शुल्क आणि उर्जा शुल्काच्या दररचनेवर आधारित प्रस्तावित दर प्रस्ताव पुढीलप्रमाणे संक्षिप्तपणे सादर करता येईल.

तक्ता – १. २० आर्थिक वर्ष २००७ करता टीपीसी – जी च्या दररचनेवर आधारित.

| Category | Demand Charge | | Energy Charge | |
|---|---|---|---|---|
| | Existing | Proposed | Existing | Proposed |
| | Rs/KVA/Month | | Rs./kWH | |
| **BEST** | | | | |
| 22/33 kV | 340 | 325 | 1.86 | 3.15 |
| 100 kV | 340 | 325 | 1.82 | 3.07 |
| | | | | |
| **REL** | | | | |
| 22/33 kV | 340 | 325 | 1.86 | 3.15 |
| 220 kV | | | 1.77 | 3.80 |
| | | | | |
| **TPC –D** | - | - | | 4.02 |

वरील तक्त्यानुसार मूळ दररचनेतून होणारी महसुल वसुली रू.३७२९ कोटी इतकी असेल.

तक्ता – १. २१:आर्थिक वर्ष २००७ करता टीपीसी – जीसाठी पायाभूत महसूल

| | Demand & Sales | | Required Base Recovery | | | | Present Recovery | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Load* (MVA) | Energy MUs | Fixed Charge | Energy Charge | Total Charge | Charge Rs/kWH | Demand Charge # | Energy Charge | Total | Charge Rs/kWH |
| **BEST** | **9,958** | **3,626** | **530** | **929** | **1,459** | **4.02** | **339** | **1,006** | **1,344** | **3.71** |
| 22/33 kV | 7,029 | 2,604 | 374 | 667 | 1,041 | 4.00 | 239 | 820 | 1,059 | 4.07 |
| 100 kV | 2,929 | 1,021 | 156 | 262 | 418 | 4.09 | 100 | 185 | 285 | 2.79 |
| Prop. of Total | | | 36% | 64% | 100% | | 25% | 75% | 100% | |
| | | | | | | | | | | |
| **REL** | **7,546** | **3,505** | **513** | **898** | **1,410** | **4.02** | **257** | **644** | **901** | **2.57** |
| 22/33 kV | 7,546 | 2,563 | 513 | 657 | 1,169 | 4.56 | 257 | 477 | 734 | 2.86 |
| 220 kV | 0 | 941 | - | 241 | 241 | 2.56 | - | 167 | 167 | 1.77 |
| Standby Charge | | | 36% | 64% | 100% | | 28% | 72% | 100% | |
| | | | | | | | | | | |
| **TPC-D (Net of RPO)** | - | **2,138** | **313** | **548** | **860** | **4.02** | | **876** | **876** | **4.10** |
| | | | | | | | | | | |
| **Total** | | **9,268** | **1,355** | **2,374** | **3,729** | **4.02** | **595** | **2,526** | **3,121** | **3.37** |

* अधिभार ग्राहकांकडून करण्यात येणाऱ्या अनअनुरूप मागणीवर आधारित आहे.

\# सध्याची उत्पन्नवसुलीदेखील अनअनुरूप मागणीवर आधारित आहे.

## १.४.३ आर्थिक वर्ष २००६ करता एफएसी ॲरिअर्सचे नियोजन

वसुली न केलेले एफएसी हे आर्थिक वर्ष २००६ या वर्षातील उत्पन्नातील तूट असे समजण्यात आले असून आर्थिक वर्ष २००७ मधील टीपीसी – जी च्या एआरआरमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

सध्याच्या एफएसी सूत्रांनुसार वसुली न झालेल्या एफएसीच्या मुद्याकडे टीपीसी – जी माननीय आयोगाचे लक्ष वेधून घेऊ इच्छिते, ज्यानुसार एफएसी शुल्क उर्जा शुल्कापेक्षा अधिक आकारण्याची तरतूद आहे. सदर एफएसीतील वाढीमुळे टीपीसी – जी च्या भविष्यातील ग्राहकांकडून वसुली केल्यानंतर त्याचा महत्वपूर्ण बलुनिंग

इफेक्ट होण्याची शक्यता असल्यामुळे सदर वाढ रद्द करण्यात यावी अशी टीपीसी १ ची मागणी आहे. इथे टीपीसी - जी नम्रपणे नमूद करू इच्छिते की ग्राहकांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या इंधन आणि उर्जा यासारख्या घटकांशी संबंधित अनियंत्रित किंमतींचे जलद संतुलन करण्यासाठी निर्माण केलेल्या दरविषयक धोरणातील तरतूदींमध्ये बदल करण्याचा हा प्रयत्न आहे. कोणत्याही प्रकारच्या वाढीमुळे सदर किंमतींची वसुली होण्यास विलंब होऊ शकतो आणि पर्यायाने भविष्यातील ग्राहकांवर त्याचा बोजा लादण्याची आवश्यकता निर्माण होते, जे दरविषयक नियमांच्या विरूद्ध आहे.

माननीय आयोगाने विशिष्ट काळातील दररचनेचा परिणाम नियंत्रित करण्यासाठी एफएसीमधील वाढीविषयी केलेल्या तरतूदीकडेही टीपीसी - जी लक्ष वेधू इच्छिते. अशाप्रकारे एफएसीमधील वसुली न झालेला भाग हा नियमित मालमत्ता समजण्यात येईल, जो भविष्यातील एआरआरद्वारे वसूल केला जाऊ शकेल. राष्ट्रीय दररचनाविषयक धोरणामध्ये सदर नियमित मालमत्तेवर काही अपवाद वगळता मर्यादा लागू केली असून भविष्यात त्याची पुनरावृत्ती केली जाऊ नये असे म्हंटले आहे याकडेही टीपीसी ÷ जी माननीय आयोगाचे लक्ष वेधून घेऊ इच्छिते.

## १.५ टीपीसी - टी चे एआरआर आणि दररचनाविषयक प्रस्ताव

प्रकरण ७ मध्ये नमूद केल्यानुसार २००७ या आर्थिक वर्षातील टीपीसी - टी चे एआरआर रू.१८४ कोटी आहे. आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण रचनेच्या एकूण महसुली आवश्यकतेत, या पारेषण रचनेचा वापर करणाऱ्यांचा सहभाग असेल. पारेषण रचनेचा वापर करणाऱ्या प्रत्येक घटकाच्या क्षमता अधिकाराच्या प्रमाणात ही विभागणी केली जाईल. म्हणजेच, बीईएसटी, आरईएल आणि टीपीसी- डी या तीन कंपन्यांचा राज्यांतर्गत पारेषण रचनेतील एकूण वाटणी करण्यात आलेल्या पारेषण हक्कांमध्ये वाटा आहे. वीज निर्मिती क्षमता वाटप आणि त्यामुळे पारेषण क्षमता वाटप याबाबत अंतिम निर्णय प्रलंबित असल्याने, हा खर्च टीपीसी- जी आणि अन्य ( आरपीओ वगळता) स्त्रोतांकडून खरेदी केल्या गेलेल्या विजेच्या प्रमाणाव वाटणी/ वसूल करण्याचा प्रस्ताव आहे.

यानुसार **प्रति पारेषित युनिटकरता रू.०.१७ ( जी - टी इंटरफेसच्या ठिकाणी)** इतके पारेषण शुल्क लागू होते.

## १.६ टीपीसीच्या परवानाक्षेत्रातील आर्थिक वर्ष २००७ चे वितरण एआरआर.

टीपीसी परवानाक्षेत्रातील आर्थिक वर्ष २००७ चे वितरण एआरआर आणि सध्याचे मागणी शुल्क आणि उर्जा शुल्क पुढीलप्रमाणे आहे.

### तक्ता – १.२२ टीपीसी – डी चे २००७ या आर्थिक वर्षाचे एआरआर.

Rs. Crores

| S No | Description | Value |
|---|---|---|
| 1 | Distribution ARR net of Non-Tariff Income | 1,180 |
| 2 | Revenue Recovery at existing Tariff | **876** |
| | Demand Charge | 209 |
| | Energy Charge # | 667 |
| **3** | **Gap/(Surplus)** | **304** |

## १.७ आर्थिक वर्ष २००७ करता वितरण दररचना प्रस्ताव.

उपरोल्लेखित आराखडयानुसार टीपीसी – डी च्या परवाना क्षेत्रातील वितरण एआरआरमुळे महसूल आणि दरांमध्ये तफावत निर्माण होते. त्यामुळे ग्राहकांकरता दररचनेमध्ये वाढीव पुनर्रचना करणे आवश्यक असून त्याद्वारे टीपीसी – डी च्या परवाना क्षेत्रातील आवश्यक महसुलाची वसुली योग्य पद्धतीने होत आहे हे पाहणे महत्वाचे आहे.

### १.७.१ आर्थिक वर्ष २००७ करता वितरण दररचना

उपरोल्लेखित माहितीनुसार प्रस्तावित दररचनेचे परिशिष्ट पुढीलप्रमाणे असेल.

### तक्ता –१.२३ सध्याचे आणि प्रस्तावित दररचना परिशिष्ट

| | Existing Tariff | | Proposed Tariff | |
|---|---|---|---|---|
| | Demand Charges Rs./kVA / Fixed Chgs. | Energy Charges Paise / kWh | Demand Charges Rs./kVA / Fixed Chgs. | Energy Charges Paise / kWh |
| **Railways** | | | | |
| - 22/33 kV | 340.00 | 260.00 | 325.00 | 380.00 |
| - 100kV | 340.00 | 254.00 | 325.00 | 370.50 |
| **HT customers** | | | | |
| - Industries | 374.00 | 285.00 | 355.00 | 425.00 |
| - Commercial | 374.00 | 285.00 | 355.00 | 425.00 |
| **- Public** | | | - | - |
| - 22kV | 374.00 | 260.00 | 355.00 | 410.00 |
| - 100kV | 374.00 | 253.50 | 355.00 | 399.75 |
| - CPP | 374.00 | 285.00 | 355.00 | 425.00 |
| **Textiles** | 374.00 | 285.00 | 355.00 | 425.00 |
| **LT 2 Part** | | | | |
| - Industries | 374.00 | 300.00 | 355.00 | 440.00 |
| - Commercial | 374.00 | 300.00 | 355.00 | 440.00 |
| **LT 1 Part** | | | | |
| - Industries | 150.00 | 400.00 | 150.00 | 540.00 |
| - Commercial | 150.00 | 400.00 | 150.00 | 540.00 |
| **Residential** | | | | |
| - S1 (0-100 units) | 25.00 | 125.00 | 25.00 | 230.00 |
| - S1 (100-300 units) | 40.00 | 300.00 | 40.00 | 405.00 |
| - S1 (above 300 units) | 40.00 | 400.00 | 40.00 | 505.00 |
| - Three Phase Customers | 100.00 | | 100.00 | - |

उपरोल्लेखित दररचनेशिवाय इंधन आणि उर्जाखरेदीच्या खरेदीदरामध्ये वाढ किंवा कपात झाल्यास त्याची वसुली किंवा परतावा देण्याकरता सर्व ग्राहकांना एफएसी शुल्क लागू केले जाईल.

## १.८ ग्राहकसेवेकरता इतर अतिरीक्त उपाययोजना

### १.८.१.१ नवीन औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांकरता दररचना

परवानाक्षेत्रातील दररचनेमध्ये सुधारणा करताना टीपीसी – डी नवीन औद्योगिक आणि व्यावसायिक प्रकल्पांच्या विकासामध्ये दररचनेमुळे अडथळे येऊ नयेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. नवीन लघुउद्योजक आणि व्यावसायिक ग्राहकांच्या आर्थिक विकासासाठी सुयोग्य अशी दररचना सादर करताना टीपीसी ÷ डी ला त्यांच्या कार्यकाळातील प्रथमवर्षातील प्रत्यक्ष मागणीवर सूट द्यावी लागेल.

### १.१२.१.२ नवीन श्रेणी – एचटी घरगुती ठोक पुरवठा

परवानाक्षेत्रातील वेगाने होणाऱ्या शहरीकरणामुळे आणि गृहबांधणी क्षेत्राच्या विकासामुळे निवासी वसाहतींमध्ये एकच एचटी जोडणी घेऊन त्यातून अंतर्गत वितरण करण्याची पद्धत वाढीस लागणे अपेक्षित आहे. अशा प्रकारच्या जोडण्यांमुळे व्यवस्थापकीय खर्चांमध्ये कपात होत असल्यामुळे परवानाधारक कंपनीस तसेच ग्राहकांनाही त्याचा लाभ मिळू शकेल.

अशा पद्धतीची जोडणी घेणाऱ्या ग्राहकांकरता दररचनेचा एक स्वतंत्र प्रकार निर्माण करण्याचा प्रस्ताव असून याच विभागातील ग्राहकगटाकरता लागू होणाऱ्या शुल्काप्रमाणे २५ टक्के युनिट्सकरता रू.२.३० / केडब्ल्यूएच आणि उर्वरित ७५ टक्के युनिट्सकरता रू.४.०५/ केडब्ल्यूएच असे उर्जा शुल्क तर रू ३५५ / केव्हीए/ प्रति महिना इतके मागणी शुल्क लागू करावे लागेल.

### १.८.१.३ एलटी १ ग्राहकांच्या अधिभारातील कमाल मर्यादेमध्ये बदल.

एलटी१ ग्राहक विभाग हा एकप्रकारे निर्बंधित प्रकार असून या विभागातील ग्राहकांनी कमाल मर्यादेमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे, ज्यायोगे त्यांना इतर कोणत्याही दररचनेचा आधार न घेता या मूळ दररचनेमध्येच कायम राहता येईल. या विभागाकरता ग्राहकाभिमुख सेवा पुरविण्याच्या उद्देशाने एलटी१ या विभागाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करून २५० केव्हीए पर्यंतच्या ग्राहकांना या विभागामध्ये तर २५० पेक्षा अधिक क्षमतेचा वीजवापर करणाऱ्या ग्राहकांकरता एलटी२ या विभागामध्ये बदल करून त्यातील दररचना लागू करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे लागू होणारी दररचना काही प्रमाणात कमी असल्यामुळे एलटी२ मधून या विभागामध्ये स्थानांतरीत होणाऱ्या ग्राहकांनाही त्याचा लाभ होऊ शकेल.

### १.८.१.४ इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सिस्टम (ईसीएस) या सेवेचा लाभ घेणाऱ्या निवासी ग्राहकांकरता सूट.

ग्राहकसेवेमध्ये सुधारणा आणि योग्यवेळेत देयके भरण्यास प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ईसीएस सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना वीयदेयकामध्ये ०.५ टक्क्यांची सूट देण्याचा टीपीसी – डी चा प्रस्ताव आहे.

## १.९ टीपीसीच्या व्यवसायाशी संबंधित अन्य काही मुद्दे.

- **आरईएल कडून २२० केव्ही वर वीजखेचणी**

  स्टँडबाय व्यवस्था नसताना २२० केव्ही वर पुरवल्या जाणाऱ्या उर्जेकरता योग्य दररचना करण्याची गरज आहे याकडे टीपीसी लक्ष वेधून घेऊ इच्छिते. आरईएलकडून घेतल्या जाणाऱ्या अशा उर्जेमुळे टीपीसीच्या अन्य ग्राहकांना (बेस्ट आणि इतर लहान ग्राहक) दररचनेविषयक तोटे सहन करावे लागतात.

- **इंधन व्यवस्था शुल्क**

  इंधन आणि उर्जाखरेदीसंबंधित किंमतींमधील बदल लागू करण्याची परवानगी टीपीसीला देताना टीपीसी ÷ डी (आणि अन्य परवानाधारक कंपन्यांकडून) कडून एफएसी अंतर्गत अशा प्रकारच्या वाढीव दरांची वसुली करण्याकरता उर्जा शुल्कामध्ये १० टक्के वाढ करण्याची तरतूद केली आहे. सदर वाढ पुढील कारणांकरता रद्द करावी अशी टीपीसीची विनंती आहे.

  - ❖ एफएसीमधील वाढीमुळे टीपीसीच्या भविष्यातील ग्राहकांना महत्वपूर्ण बलुनिंग इफेक्टला सामोरे जावे लागेल.
  - ❖ ग्राहकांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या इंधन आणि उर्जा यासारख्या घटकांशी संबंधित अनियंत्रित किंमतींचे जलद संतुलन करण्यासाठी निर्माण केलेल्या दरविषयक धोरणातील तरतूदींमध्ये बदल करण्याकरता एफएसीमध्ये वाढ करण्याची तरतूद केली आहे.
  - ❖ कोणत्याही प्रकारच्या वाढीमुळे सदर किंमतींची वसुली होण्यास विलंब होऊ शकतो आणि पर्यायाने भविष्यातील ग्राहकांवर त्याचा बोजा लादण्याची आवश्यकता निर्माण होते, जे दरविषयक नियमांच्या विरूद्ध आहे.
  - ❖ पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमतींमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असून भारत सरकारलाही त्यामुळे ठराविक कालावधीनंतर सदर उत्पादनांच्या किंमतीमध्ये वाढ करणे भाग पडते.
  - ❖ एफएसीच्या सध्याच्या सूत्रानुसार वर्षातील सम आणि विषम महिन्यांकरता दोन समांतर एफएसी लागू होतात, याकडेही टीपीसी आयोगाचे लक्ष वेधून घेऊ इच्छिते. या दोन्ही समांतर एफएसींमधील वसुलीतील तूट आणि अतिरिक्त वसुली यांमधील योग्य पद्धतीने केल्या जाणाऱ्या अंतर्गत सामंजस्यरचनेस परवानगी देण्याच्या शक्यतेविषयी माननीय आयोग विचार करू शकेल.